रायगड, शनिवार, दि. २ नोव्हेंबर २०२४

# कृषीवल

किंमत ४ ₹

**उद्या अंक नाही!**

दिवाळी पाडव्यानिमित्त शनिवार, दि. २ नोव्हेंबर २०२४ रोजी कृषीवल कार्यालयाला सुट्टी असल्याने रविवार, दि. ३ नोव्हेंबरचा अंक प्रसिद्ध होणार नाही. याची सर्व वाचक, वितरक, जाहिरातदार व हितचिंतक यांनी नोंद घ्यावी.

– मुख्य संपादक

### नैना प्रकल्पाच्या अधिकाऱ्यांना पिटाळले

**पनवेल :** नवी मुंबई विमानतळ प्रभाव अधिसूचित क्षेत्रातील (नैना प्रकल्प) ४० गावांमध्ये सिडको महामंडळ रस्त्यांच्या पायाभूत सुविधा उभारण्यासाठी साडेपाच हजार कोटी रुपये खर्च करणार आहे. या कामांचे ठेकेसुद्धा सिडको मंडळाने विविध ठेकेदारांना वाटप केले. नैना स्थापनेनंतर ११ वर्षांनी पहिल्यांदा नैना प्रकल्पात रस्ते व इतर पायाभूत सुविधांचे काम सुरु करण्यासाठी सिडको मंडळाने कंबर कसली असल्याने देवद गावामध्ये या कामांची सुरुवात करण्यासाठी ठेकेदार कंपनीचे दोन अधिकारी गावात दाखल झाल्यानंतर अधिकाऱ्यांना ग्रामस्थांच्या रोषाचा सामना करावा लागला.

## मतदारसंघातील कोळी समाजाची

# गद्दाराकडून थट्टा

**रामराजच्या सभेत आमदारांची जीभ घसरली**

**। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यातील कोळी समाज हा जीवावर बेतून कुटुंबाचा गाडा हाकत आहे. सरकारकडून मिळणाऱ्या अनेक योजना त्यांच्यापर्यंत पोहोचतही नाहीत. डिझेल परतावा, जाळ्यासाठी अनुदान, बोटीची देखभाल, दुरुस्तीसाठी पाठबळ नसतानाही ते जीव धोक्यात टाकून, निसर्गाच्या खेळाचे आव्हान स्वीकारुन उदरनिर्वाह करतात. त्यांचे जिल्ह्याच्या जडणघडणीतही अमूल्य योगदान आहे. असे असताना शिंदे गटाचे आ. महेंद्र दळवी यांनी रामराज येथील सभेत कोळी बांधवांची केलेली थट्टा त्यांच्या चांगलीच अंगाशी येणार असल्याची चर्चा सध्या जोर धरत आहे. छोटमला त्यांच्या कार्यकर्त्यांसह परत होडीवर पाठवतो, तो तांडेल आणि कार्यकर्ते खलाशी, असे बोलत समाजाची टिंगल केली.

> “बेताल वक्तव्य करुन आमदार महेंद्र दळवी यांनी कोळी समाजाची थट्टाच केली आहे. कोळी बांधवांचा आमदारांनी अवमान केला आहे. कोळी लोकांनी काय मोठे होऊच नये का? तुम्ही आापपसातील उणीधुणी काढत बसा, आम्हाला काहीच देणे–घेणे नाही. परंतु, आमच्या समाजाला बदनाम करु नका. आमदारांच्या या वक्तव्याचा मी संपूर्ण कोळी समाजाच्यावतीने निषेध करतो.”
>
> – विजय गिदी, अध्यक्ष महाराष्ट्र राज्य मच्छिमार संघ मुंबई

अपक्ष उमेदवार दिलीप भोईर यांनी उमेदवारी अर्ज भरल्यानंतर जाहीर सभा घेतली. या सभेत

> “आमदारांनी आमच्या कोळी समाजाची इज्जत काढली आहे. त्यांनी असं बोलायला नको होते. आमदार आम्हाला काय कमी लेखतात का? आम्ही आमच्या मेहनतीने धंदा करतो. आम्ही कोणाची चाकरी करीत नाही. आमदारांनी असे शब्द वापरणे चुकीचे आहे.”
>
> – मनोहर बैले, उपाध्यक्ष रायगड जिल्हा मच्छिमार संघ

त्यांनी दळवींच्या निष्क्रियतेचा पाढाच वाचला. तसेच त्यांच्या बगलबच्चांचाही खरपूस समाचार घेतला होता. भोईरांनी काढलेला चिमटा चांगला जिव्हारी लागल्याने दळवींनी रामराज येथील सभेत भोईरांवर टीकास्त्र सोडले. मात्र, हे करीत असताना त्यांनी कोळी समाजाच्या भावना दुखावल्या. कोळी बांधवांच्या मासेमारी व्यवसायाची त्यांनी भरसभेत थट्टा केली.



छत्रपती शिवाजी महाराजांनी कोळी बांधवांच्या उपस्थितीत स्वराज्याच्या व भारताच्या इतिहासातील पहिल्या आरमाराची मुहूर्तमेढ रोवली होती. छत्रपती शिवाजी महाराजांबरोबरच पेशव्यांनीही कोळी बांधवांमधील धैर्य, काटकपणा आणि प्राण पणाला लावण्याची वृत्ती ओळखून स्वराज्याच्या मोहिमांमध्ये सहभागी करून घेतले होते. असे असताना कोळी समाजाची त्यांच्या व्यवसायाची थट्टा करुन राजकारण करणे चुकीचे असल्याची भावना कोळी बांधवांनी व्यक्त केली आहे.

**बदला घेणार**

राजकीय व्यासपीठावर एखाद्या समाजाची टिंगल करणे आ. दळवींना चांगलेच भोवणार असून, येत्या निवडणुकीत कोळी बांधव याचा बदला घेणार असल्याची चर्चा कोळी बांधवांमध्ये सुरु होती. केवळ सत्तेसाठी दळवींनी मासेमारी व्यवसायाला हिणवलं असून, लवकरच मतपेटीत त्यांना त्यांची योग्य जागा दाखविणार असल्याचे मतही नागरिकांनी व्यक्त केले आहे.

# महेश बालदींनी माफी मागावी

**अखिल आगरी परिषदेची मागणी**

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

राज्यातील विधानसभेच्या निवडणुका होऊ घातल्या आहेत, त्या निडणुकीमध्ये अखिल आगरी समाज परिषद राजकारणापासून अलिप्त आहे. असे असताना उरण विधानसभेतील उमेदवार महेश बालदी यांनी एका जाहीर सभेत ‘‘मी अखिल भारतीय आगरी समाज परिषदेच्या निवडणुकीला उभा नसून, विधान परिषदेच्या निवडणुकीला उभा आहे’’, असे वक्तव्य करून आगरी समाजाला कमी लेखण्याचा प्रयत्न केला आहे. हे त्यांचे वक्तव्य निषेधार्ह असून, आगरी समाजाची त्यांनी जाहीर माफी मागावी, असे अखिल आगरी समाज परिषदेने त्यांना सुचविले आहे.

अखिल आगरी समाज परिषद ही राजकारणविरहित सामाजिक काम गेले अनेक वर्षे करीत आहे. या परिषदेसाठी कॉ. जी.एल. पाटील, ग.ल. पाटील, वाजेकर शेठ, सोनूभाऊ बसवंत, ॲड. दत्ता पाटील, प्रभाकर पाटील व दि.बा. पाटील यांनी फार मोठे योगदान दिले आहे. दि.बा. पाटील यांनी १९८८ ते २०१३ पर्यंत या परिषदेचे समर्थ नेतृत्व केले आहे. त्यांचे नाव नवी मुंबईतील आंतरराष्ट्रीय विमानतळाला देण्याची मागणी केली जात आहे. यासाठी अखिल आगरी समाज परिषदेच्या माध्यमातून मुंबई, नवी मुंबई, रायगड, ठाणे, पालघर, नाशिक, पुणे आदी जिल्ह्यांतील प्रकल्पग्रस्त, भूमीपुत्रांसाठी सर्वपक्षीय लढा दिला. त्यामुळे या लढ्याची दखल घेऊन राज्य सरकारने या नवी विमानतळाला लोकनेते दि.बा. पाटील यांचे नाव देण्याचा ठराव महाराष्ट्र विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात मंजूर केला व तो पुढील कार्यवाहीसाठी केंद्र सरकारकडे पाठविण्यात आला. लवकरच या विमानतळाला लोकनेते दि.बा. पाटील यांचे नाव जाहीर करण्यात येईल, असे आश्वासन केंद्रीय नागरी हवाई वाहतूक मंत्री नायडू यांनी सर्वपक्षीय कृती समितीला दिले आहे. असे असताना महेश बालदी यांनी एका जाहीर सभेत अदानी विमानतळाशी चर्चा केली असल्याचे सांगितले. हे ही त्यांचे वक्तव्य चुकीचे व दि.बा. पाटील यांच्या नावाला विरोध करणारे असल्याची समज आगरी

●➤ पान २ वर

> “महेश बालदी यांनी आगरी समाजाचा एका भाषणात अपमान केला आहे. तसेच अदानी विमानतळ असादेखील त्यांनी उल्लेख केला आहे. त्यांची दोन्ही व्यक्तव्ये चुकीची आहेत. जर महेश बालदी यांनी जाहीर माफी नाही मागितली, तर आठ दिवसांनी परिषदेची बैठक बोलावून पुढची दिशा ठरविण्यात येईल. अखिल आगरी समाज परिषदेचा कोणत्याही राजकीय पक्षाशी संबंध नाही. असे असले तरी मुद्दामहून आगरी समाजाला राजकारणात खेचले जात आहे. समाजातील लोकांची दिशाभूल केली जात आहे. हे आम्ही खपवून घेणार नाही”
>
> – दशरथ पाटील, अध्यक्ष अखिल आगरी समाज परिषद

**आजचा अग्रलेख**

**मिठाई वाटा, पण...**

## वे|ध|क

### तरुणाची हत्या

**मुंबई :** मुंबईतील अँटॉप हिल परिसरात एका २० वर्षीय तरुणाची फटाके फोडण्यावरुन झालेल्या वादातून हत्या करण्यात आल्याची घटना घडली आहे. विवेक गुप्ता असे हत्या करण्यात आलेल्या तरुणाचे नाव आहे. शुक्रवारी अँटॉप हिल परिसरातील जय महाराष्ट्र नगरमध्ये ही घटना घडली. माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. तरुणाचा मृतदेह शवविच्छेदनासाठी रुग्णालयात पाठवण्यात आला. तरुण विवेक गुप्ता याच्या हत्येप्रकरणी पोलिसांनी पाच जणांना अटक केली आहे. आरोपींमध्ये एका महिलेचाही समावेश आहे.

### मराठ्यांच्या यादीविरोधात ओबीसींची यादी

**जालना :** विधानसभा निवडणुकीत जरांगे पाटलांनी मराठा उमेदवार उभे केले आहेत. दोन दिवसांत कोणता उमेदवार निवडणूक लढविणार आणि कोणाला पाडायचे याची माहिती जरांगे जाहीर करणार आहेत. याला प्रत्युत्तर देण्यासाठी ओबीसी आरक्षण आंदोलक लक्ष्मण हाकेंनीही तयारी केल्याचे जाहीर केले आहे. ४ तारखेला जरांगे उमेदवार देणार नाहीत, तर हॉस्पिटलला ॲडमिट असतील असे सांगताना मराठ्यांच्या यादीला ओबीसींची यादी तयार केल्याचे हाके म्हणाले. जरांगे आज एक बोलतील आणि उद्या एक बोलतील. जरांगे यांनी उमेदवार उभे करावेत, असे ते म्हणाले.

# रस्त्याच्या संरक्षक भिंतीचे काम कागदावरच

- **निधी मंजुरीला दोन वर्षे उलटून काम नाहीच**
- **आ. दळवींकडून विकासाचा बाता मारण्याचे काम**

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

गावे, वाड्यांच्या विकासासाठी कोट्यवधी रुपयांचा निधी आणला असल्याच्या दावा आमदार दळवी करीत आहेत. मात्र, बेलोशी येथील सागवाडी रस्त्याला संरक्षक भिंत बांधण्यासाठी दहा लाख रुपयांचा निधी मंजूर होऊन दोन वर्षे झाली. मात्र, अजूनपर्यंत संरक्षक भिंत बांधण्यात आली नाही. त्यामुळे संरक्षक भिंतीचे काम कागदावर असल्याचे चित्र दिसून येत आहे.

मागील निवडणुकीत रस्त्यांचे भांडवल करीत दळवी यांनी मते मिळविली. परंतु, अलिबाग-रोहा मार्गावरील रस्त्याचे काम आजही संथ गतीने सुरु आहे. खडकाळ रस्त्यांमुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. विकासाच्या नावाखाली कोट्यवधी रुपयांचा निधी आणल्याच्या बाता आमदारांनी मारल्या. त्याची जाहिरातबाजीदेखील केली. परंतु, आजही अनेक गावे विकासापासून वंचित असल्याचे चित्र आहे.

बेलोशी येथील खात्रीशीर सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, सागवाडी हे गाव बेलोशीपासून दोन किलोमीटर अंतरावर असून, या ठिकाणी ठाकूर

●➤ पान २ वर

**लक्ष्मीपूजन उत्साहात**



● लक्ष्मी पूजनानिमित्त घराघरात, दुकानांमध्ये आणि कार्यालयात श्रीलक्ष्मीची विधीवत पूजा पार पडली. त्यानंतर मुक्त हस्ते झालेल्या फटाक्यांच्या आतषबाजीत अवघा आसमंत न्हाऊन निघाला. (छायाचित्र : सुधीर नाझरे)

# मविआची प्रचारमोहीम ६ नोव्हेंबरपासून : पवार

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

विधानसभा निवडणुकीसाठी महाविकास आघाडीची प्रचार मोहीम सहा नोव्हेंबरपासून सुरू होणार आहे. काँग्रेस नेते राहुल गांधी, शिवसेनेचे उद्धव ठाकरे व आणि मी अशी एकत्रित मोहीम सुरू होईल, अशी माहिती ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी दिली.



आज दिवाळी आहे. कटू बोलणे नको, असे म्हणत त्यांनी सिंचन घोटाळाप्रकरणी सुरू असलेल्या आरोप-प्रत्यारोपांबाबत बोलणे टाळले. मविआचे ज्या मतदारसंघात दोन किंवा अधिक अर्ज दाखल झाले आहेत, त्यासंबंधी बसून आम्ही योग्य तो मार्ग काढू, असेही त्यांनी स्पष्ट केले. आम्ही एकत्रित प्रचार मोहीम राबवून लोकांनी पाठिंबा द्यावा, अशी परिस्थिती निर्माण करू. राज्यातील जनता आम्हाला साथ देईल, असे पवार म्हणाले.

राज्यातील जनतेला पवार यांनी दीपावलीच्या शुभेच्छा दिल्या. ते म्हणाले, दीपावलीच्या निमित्ताने सगळे एकत्र येतात. एकमेकांशी सुख-दुःखे सांगतात. मला खात्री आहे, महाराष्ट्रातील जनता दीपावलीच्या प्रसंगी समाधान आणि आनंदाने एकत्र येतील. मी सर्वांना दीपावलीच्या शुभेच्छा देतो. जनतेचा आत्मविश्वास वाढो, अशी सदिच्छा व्यक्त करतो.

# जिल्हाभरात भातकापणीला वेग

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यामध्ये भाताची रोपे कापणी योग्य झाली आहेत. पावसाने विश्रांती घेतल्यानंतर गेल्या आठ दिवसांपासून कापणीची कामे सुरु झाली आहे. शेतकरी कापणीच्या कामात मग्न झाला आहे. आतापर्यंत १० टक्क्यांहून अधिक कापणीची कामे पूर्ण झाली आहेत. येत्या पंधरा दिवसांत ही कामे पूर्ण होण्याची शक्यता शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.

जिल्ह्यामध्ये यंदा सुमारे ९४ हजार हेक्टर क्षेत्रामध्ये भातलागवड करण्यात आली होती. सुवर्णा, कोलम, रत्ना अशा अनेक भातपिकांवर शेतकऱ्यांनी भर देत पेरणी केली होती. जिल्ह्यात पावसाने उशिरा सुरुवात केली. जुलै महिन्याच्या पहिल्या आठवड्यापासून पावसाने हजेरी लावली. त्यानंतर रोपे लावणीची कामे सुरु झाली. जुलै महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात ही कामे पूर्ण झाली. यावर्षी भातासाठी पोषक वातावरण निर्माण झाले होते. कापणीयोग्य भातपीक तयार झाले होते. परंतु, परतीच्या पावसामुळे शेतांसह सखल

●➤ पान २ वर

**पेंढ्याचे बंध कालबाह्य होण्याच्या मार्गावर**

भातकापणी झाल्यावर पाच दिवसांनी भातांच्या रोपांची बांधणी केली जाते. उडवी रचून शेतामध्ये ठेवली जातात. बांधणीसाठी पेंढ्याचे बंध तयार करण्याचे काम शेतकरी करतात. परंतु, गेल्या चार–पाच वर्षांपासून जिल्ह्यातील अनेक भागात कापडी दोर बांधणीसाठी दाखल झाले आहेत. त्यामुळे पेंढ्याचे बंध कालबाह्य होण्याच्या मार्गावर असल्याचे चित्र आहे.

**हजारो हातांना मिळतेय काम**

जिल्ह्यात गेल्या अनेक दिवसांपासून भातकापणीला सुरुवात झाली आहे. भातकापणीमुळे वाड्या–वस्त्यांमधील बेरोजगार मजुरांना रोजगार मिळू लागले आहे. कापणी करण्यासाठी काही ठिकाणी ३५० रुपये, तर झोडणीसाठी ६०० रुपये मजुरी आहे. अनेक शेतांवर वाड्या–वस्त्यांमधील मजूर काम करीत आहेत. विशेष म्हणजे, आदिवासीवाड्यांमधील मंडळींना रोजगाराचे साधन उपलब्ध झाले आहे.



> “पावसामुळे भातकापणीची कामे पंधरा दिवस लांबणीवर गेली. शेतामध्ये पाणी साचल्याने भाताला कोंब आले. शेतकऱ्यांना या परतीच्या पावसाचा फटका प्रचंड बसला आहे. पाऊस थांबल्याने कापणीला गेल्या काही दिवसांपासून सुरुवात केली आहे.”
>
> – सतीश म्हात्रे, शेतकरी

# विक्रेत्यांकडून ‘एक्स्पायरी डेट’ टाकण्याच्या नियमाला बगल

**कारखान्यांमध्ये मात्र स्वच्छता ठेवण्याला विक्रेते देताहेत प्राधान्य**

**। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।**

खुल्या मिठाईवरही एक्स्पायरी डेट टाकणे बंधनकारक करण्यात आलेले असूनदेखील पनवेल परिसरातील अनेक विक्रेत्यांनी मात्र या नियमाला बगल दिल्याचे पाहायला मिळत आहेत. मिठाई तयार करण्याचे कारखाने मात्र स्वच्छ व टापटीप ठेवण्याला दुकानदारांनी भर दिल्याचे दिलासादायक चित्र यंदा पाहायला मिळाले आहे.

दिवाळीनिमित्त एकमेकाला गोडधोड पदार्थ भेट देण्याची प्रथा असून, मिठाई खरेदीला मोठ्या प्रमाणात पसंती दिली जात असल्याने मिठाईच्या मागणीतदेखील वाढ होत असल्याने विक्रेते नेहमीपेक्षा जास्त प्रमाणात मिठाई तयार करण्यास प्राथमिकता देत असतात. काही दिवस अगोदरच तयार करण्यात येणारी ही मिठाई अनेकदा खराब होण्याची शक्यता असल्याने पाकीटबंद खाद्यपदार्थांवर उत्पादन तारीख आणि ते कधीपर्यंत वापरावे (एक्स्पायरी डेट) याची तारीख टाकण्याचे बंधन घालण्यात आले आहे. अन्नसुरक्षा आणि मानक प्राधिकरणाने (एफएसएसएआय) याबाबतचा आदेश काढला आहे. दुकानांमध्ये पेढे, बर्फी,

●➤ पान २ वर

**कारखान्यात स्वच्छता वाढली**

दसरा–दिवाळी येताच सर्वत्र मिठाई बनवण्याचे अस्वछ कारखाने आणि तेथील गलिच्छ वातावरणाची चर्चा होत असते. यंदा मात्र कारवाईच्या भीतीने मिठाई बनवण्याच्या कारखान्यांमधील अस्वच्छता व गलिच्छपणा काही प्रमाणात कमी झाला असून, विक्रेतेदेखील हॅग्लोज वापरण्यासोबत डोक्यावर पारदर्शक टोपीचा वापर करताना दिसत आहेत.

**गावभेटीदरम्यान घेतले ग्रामदेवतांसह ज्येष्ठांचे आशीर्वाद**

# चिऊताई, विजयी भवः!

**। चौल । प्रतिनिधी ।**

शेतकरी कामगार पक्षाच्या अधिकृत उमेदवार चित्रलेखा नृपाल पाटील उर्फ चिऊताई यांनी प्रचारात आघाडी घेतली असून, बुधवारी (दि. ३०) चौल विभागातील अनेक गावांना भेटी दिल्या. दरम्यान, त्यांनी अनेक निष्ठावान ज्येष्ठ कार्यकर्त्यांच्या घरी जाऊन त्यांचे आशीर्वाद घेतले. यावेळी ज्येष्ठांनी स्व. प्रभाकर पाटील, स्व. दत्ता पाटील यांच्यासोबत केलेल्या कामांबरोबरच्या आठवणींना उजाळा दिला. यावेळी त्यांनी चिऊताईंना आपणच विजयी होणार याची खात्री देत आशीर्वाद दिले. दरम्यान,



चित्रलेखा पाटील यांचे अनेक ठिकाणी औक्षण करीत उमेदवारी मिळाल्याबद्दल अभिनंदन केले.

चौल विभागातील ग्रामदेवतांसह ज्येष्ठ कार्यकर्त्यांचे आशीर्वाद घेण्यासाठी शेकापच्या अधिकृत उमेदवार चित्रलेखा नृपाल पाटील उर्फ चिऊताई यांनी बुधवारी चौल विभागातील चौलमळा, सागमळा, एस. नाईक आळी, तुलाडदेवी, चौल बेलाई, चौल भोवाळे तसेच चौल पंचक्रोशितील अनेक गावांना भेटी देत तेथील ग्रामदेवतांसह पक्षाच्या निष्ठावान ज्येष्ठ कार्यकर्त्यांच्या घरी जाऊन त्यांचे आशीर्वाद घेतले. यावेळी ‘‘तुम्ही निश्चिंत राहा, आम्ही तुमच्यासोबत आहोत. आपला विजय विक्रमी मताधिक्यानेच होणार’’, असा शब्द यावेळी चौल विभागातील ग्रामस्थांनी चित्रलेखा पाटील यांना दिला.

दरम्यान, या गावभेटीदरम्यान चित्रलेखा पाटील यांनी चौलमळा येथील जयंत नाईक, किशोर घरत, जीवन लोहार,

●➤ पान २ वर

## चित्रलेखा पाटील यांचा चौलमध्ये झंझावात

**ज्येष्ठांनी जागवल्या आठवणी**

चित्रलेखा पाटील यांच्या गावभेटीदरम्यान चौलमळा येथील ९१ वर्षीय बाळाराम बाळकृष्ण नाईक (अण्णा) यांनी जुन्या आठवणींना उजाळा दिला. आम्ही त्या काळात खटारा घेऊन गावागावात प्रचार करायचो. मी स्व. प्रभाकर पाटील, स्व. दत्ता पाटील यांच्यासोबत काम केल्याचे त्यांनी सांगितले. तसेच चिऊताई, तुम्ही निश्चिंत राहा, विजय तुमचाच आहे, असा आशीर्वादही त्यांनी यावेळी चित्रलेखा पाटील यांना दिला. यावेळी चित्रलेखा पाटील यांनी अण्णांचे चरणस्पर्श करीत पुढील कार्यक्रमासाठी मार्गस्थ झाल्या.

# नवमतदारांसह ज्येष्ठ ठरणार निर्णायक

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यातील सात विधानसभा मतदारसंघांतील निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाला आहे. जिल्ह्यात १८ ते १९ तसेच ८५ वर्षांपुढील असे एकूण ८७ हजार ४७१ मतदार आहेत. या निवडणुकीत नवमतदारांसह ज्येष्ठ मतदारांचे मतं निर्णायक ठरणार आहे.

रायगड जिल्ह्यातील अलिबाग, पेण, पनवेल, उरण, महाड, श्रीवर्धन, कर्जत या सात विधानसभा मतदारसंघांतील निवडणुकीसाठी १११ उमेदवारांनी १४० उमेदवारी अर्ज दाखल केले. बुधवारी (दि.३०) दुपारी तीन वाजेपर्यंत झालेल्या छाननीमध्ये सर्वच अर्ज पात्र ठरविण्यात आले आहेत. अर्ज माघे घेण्याची प्रक्रीया ४ नोव्हेंबर रोजी असणार आहे. त्यानंतर उमेदवारांची अंतिम यादी प्रसिध्द केली जाणार आहे. त्यामुळे सोमवारीनंतर चित्र स्पष्ट होणार आहे. २० नोव्हेंबरला मतदान होणार आहे. दोन हजार ७९० केंद्रामध्ये मतदान प्रक्रीया पार पाडणार आहे. सातही विधानसभा

●➤ पान २ वर

**विधानसभा मतदारांवर दृष्टीक्षेप**

| मतदारसंघ | १८ ते १९ वयोगट | ८५ वर्षांवरील मतदार |
|---|---|---|
| पनवेल | १४८५० | ३९३६ |
| कर्जत | ७२६० | ६५४१ |
| उरण | ७६९२ | ३५६५ |
| पेण | ६४१० | ४३९८ |
| अलिबाग | ६०४२ | ६६७६ |
| श्रीवर्धन | ३९३५ | २८४७ |
| महाड | ५३८३ | ६८९६ |
| एकूण | ५१६१२ | ३५८५९ |

# बळीराजाचे शिवार बहरले

## शेतातील पिवळे सोने आणण्यासाठी सर्वत्र लगबग

। चिरनेर । प्रतिनिधी ।

**यावर्षी सुरुवातीला पाऊस दमदार पडला. त्यानंतर टप्प्या-टप्प्याने बरसलेल्या जलधारांमुळे भातशेतीत उत्तम भातपीक आले आहे. दरम्यान, उरण तालुक्यातील भातशेतीतील १४० ते १५० दिवसांचे भातपीक पूर्ण तयार झाले असून, ठिकठिकाणी भातकापणी, बांधणी आणि झोडणीची लगबग सुरू आहे. शेतकरी राजा भातपिकांच्या कापणी, मळणीच्या कामात गुंतला असून, शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळेल असे दिसून येत आहे.**



दरम्यान, ओडिशामधील दाना वादळाचा परिणाम महाराष्ट्रात कोकण आणि अन्य भागात होण्याची शक्यता हवामान खात्याने व्यक्त केल्याने बळीराजा पावसाच्या सावटामुळे चिंताग्रस्त आहे. उरणमधील बहुतांशी शेतकऱ्यांना भातकापणी पुढे ढकलावी, असे वाटत आहे. तापमान वाढलेले असल्याने पाऊस येणार असे अनुमान ज्येष्ठ शेतकरी गोपाळ केणी, दीपक पाटील यांनी व्यक्त केले. उरण तालुक्यातील चिरनेर, कळंबुसरे, कोप्रोली, मोठीजुई, खोपटे, सारडे, वशेणी, साई, दिघाटी, आवरे, गोवठणे, पाले, पिरकोन तसेच या भागातील विविध गावातील भातशेती लागवडी क्षेत्रावर भातपीक बहरले असून, हे भात पीक कापणी करण्यासाठी पूर्ण तयार झाले असल्याचे येथील शेतकरी बांधवांनी सांगितले.

यंदा भातपीक दसऱ्याला पूर्णतः तयार झाले असून, तेव्हापासून मिळतील तसे मजूर घेऊन युद्धपातळीवर कापणी, बांधणी व झोडणीच्या कामांची लगबग सुरू आहे. परंतु, शेतमजुरांची संख्या या भागात घटत चालल्याने बहुतांशी शेतकऱ्यांना भातपिके तयार असूनदेखील उशिरा कापणी बांधणीची कामे करावी लागत आहेत. लहरी पावसामुळे या भागात कापणी करून त्याची उडवी घालून साठवणूक न करता भातपिकांची ताबडतोब झोडणी केली जात आहे. शेतीसाठी लागणारे बियाणे, खते, मजूर, अवजारे इत्यादी खर्चाने शेतकऱ्यांची कंबर मोडून जाते. यावर्षी भातपीक चांगले आले म्हणून शेतकरी राजा आनंदात होता. मात्र, दरवर्षीप्रमाणे यावर्षीही शेवटच्या क्षणाला भातशेतीवर अवकृपा होऊन, नुकसान हे झालेच आहे, अशी माहिती हरिश्चंद्र गोंधळी, कल्पेश म्हात्रे यांनी दिली.

# माथेरानमधील अतिक्रमणाचा वनसमितीकडून बिमोड

। माथेरान । वार्ताहर ।

कस्तुरबा रोडवरील हॉटेल मेघदूतशेजारील वनखात्याच्या रिक्त प्लॉटवर जवळपास वीस गुंठे जागेवर अतिक्रमण करून जागा बळकावण्याचा प्रयत्न वनखात्याच्या अधिकाऱ्यांनी हाणून पाडला आहे.




माथेरानमध्ये नगरपरिषदेच्या सभागृहात लोकप्रतिनिधी नसल्याने मागील तीन वर्षांपासून प्रशासकीय राजवट आहे. त्यामुळेच याठिकाणी राजकीय लोकांच्या आशीर्वादानेच अतिक्रमणाचा पारा दिवसेंदिवस वाढतच चालला आहे. माथेरानबाहेरील मंडळी इथे पोट भरण्यासाठी आलेली असून, स्वतःचीच जागा असल्याचा आविर्भाव आणून वनखात्याच्या जागांवर बिनदिक्कतपणे अतिक्रमणे करून जागा हडप करत आहेत. यातील काही ठिकाणी वनखात्याच्या अधिकारीवर्गाकडून आणि वन समितीच्या पदाधिकाऱ्यांनी काही अतिक्रमणे उद्ध्वस्त केल्यामुळे नागरिकांनी सुटकेचा निःश्वास सोडला आहे.

कस्तुरबा रोडवरील अद्यापही काही ठिकाणी वनखात्याच्या लाखो रुपये किमतीच्या जागा मोठ्या प्रमाणात लाटलेल्या आहेत. त्या सर्व जागा ताब्यात घेणे आवश्यक असल्याचे नागरिक बोलत आहेत. पिढ्यान्‌पिढ्या वास्तव्यास असणाऱ्या भूमीपुत्रांनी थोडेफार बांधकाम केले की ताबडतोब कारवाईचा बडगा उगारला जातो आणि जी मंडळी इथे पोट भरण्यासाठी आलेली आहेत त्यांनी तर वस्तीच्या ठिकाणी तसेच आजूबाजूच्या मोकळ्या जागेत जंगले उद्ध्वस्त करून झोपड्या उभारल्या आहेत. त्यामुळेच इथली वनराई संपुष्टात आल्याने थंड हवेच्या माथेरानमध्ये उष्मा जाणवत आहे. मुख्य महात्मा गांधी मार्गावरसुद्धा अनेक हॉटेलधारकांनी वनखात्याच्या जागा बळकावून त्याठिकाणी हॉटेलच्या दर्शनी भागात पर्यटकांना बसण्यासाठी तसेच लहान मुलांना खेळण्यासाठी साहित्य ठेवले आहे. आजपर्यंत या भागात वनखात्यामार्फत कोणत्याही प्रकारची कारवाई करण्यात आलेली नाही. निदान या हॉटेलधारकांकडून वार्षिक भाडे आकारल्यास वनखात्याच्या तिजोरीत भर पडू शकते. राजकीय मंडळी स्वतःच्या स्वार्थासाठी शासनाच्या जागांवर अतिक्रमण करण्यास मुभा देत आहेत, अशा राजकारण्यांवर शासनाने कठोर कारवाई करावी, अशीही मागणी जोर धरू लागली आहे.

> कस्तुरबा रोडवरील अनेक हॉटेलवाले माथेरानमधील प्रतिष्ठित राजकारणी लोकांना हाताशी धरून आपल्या हॉटेल, बंगलाशेजारील वनखात्याचे राखीव प्लॉट अतिक्रमण करून आपल्या प्रॉपर्टीला जोडत आहे, वनखात्याने अतिशय तत्परतेने यावर यापूर्वी हॉटेल साईबानं, हॉटेल पार्क व्ह्यू व आता हॉटेल मेघदूतच्या बाजूच्या वनविभागाच्या जागेवरील अतिक्रमणवर कारवाई केली आहे. या कारवाईमध्ये माथेरानमधील जागरूक नागरिकांचा महत्त्वाचा वाटा आहे.
> - योगेश जाधव, अध्यक्ष, वन व्यवस्थापन समिती माथेरान

# ‘आप’चा सुधाकर घारेंना पाठिंबा

। नेरळ । प्रतिनिधी ।



सुधाकर घारे हे दमदार उमेदवार असून, त्यांच्याकडे विकासाचे व्हिजन आहे. चौक सुशोभिकरण हा विकास नसून, तरुणांच्या हाताला काम आणि मतदारसंघातील जनता आनंदाने राहिली पाहिजे यासाठी योग्य उमेदवार म्हणून सुधाकर घारे यांना पाठिंबा देण्याचा निर्णय आम आदमी पार्टीने घेतला. दरम्यान, महाराष्ट्रात आम आदमी पक्ष इंडिया आघाडीचा घटक पक्ष असून, महाविकास आघाडीचा घटक पक्ष नाही, अशी माहिती महाराष्ट्र प्रदेश संघटन मंत्री ॲड. रियाझ खान यांनी दिली.

कर्जत विधानसभा मतदारसंघातील परिवर्तन आघाडीचे उमेदवार सुधाकर घारे यांना आम आदमी पक्षाचे पाठिंबा देण्यासाठी पत्रकार परिषदेचे आयोजन केले होते. यावेळी महाराष्ट्र राज्य संघटन मंत्री ॲड. रियाझ पठाण खान, खालापूर तालुका सचिव चंद्रप्रकाश उपाध्याय, खोपोली शहर अध्यक्ष विवेक वाघमारे उपस्थित होते. यावेळी अपक्ष उमेदवार सुधाकर घारे परिवर्तन विकास आघाडीला पाठिंबा देऊन आमच्या आघाडीला ताकद देण्याचे काम केले आहे. योग्य उमेदवार ओळखून त्यांनी पाठिंबा दिला आहे आणि त्यामुळे त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहण्याचा विश्वास व्यक्त केला. त्याचवेळी आम आदमी पक्षाच्या कार्यकर्त्यांवर कोणतेही प्रसंग आल्यास त्या-त्या वेळी मदतीसाठी आघाडीवर असेल, असे आश्वासन सुधाकर घारे यांनी दिले.

# दीपावलीनिमित्त फराळ, साड्यांचे वाटप

। रसायनी । वार्ताहर ।



जिल्ह्यातील विविध आदिवासी वाड्यांवर जगद्गुरु नरेंद्राचार्य महाराज यांच्या जिल्हा व तालुका सेवा समितीतर्फे मोफत फराळ व साड्या वाटप करण्यात आले.

सामजिक उपक्रमांतर्गत पोयंजे कातकरी वाडी, बारवई भोकरपाडा वाडी, समतानगर , सोनार वाडी, बागेची वाडी, खैराट वाडी, दाभोळ वाडी, कोरळ वाडी, गुळसुंदे पलाट वाडी या आदिवासी वाड्यांवर फराळ व साड्या वाटप करण्यात आल्या. या कार्यक्रमाला जिल्हा सेवा समिती, तालुका समिती, तालुका विशेष कार्यवाहक, तालुका आजी-माजी पदाधिकारी, शिष्यगण उपस्थित होते.जगद्गुरु नरेंद्रचार्ज महाराज संस्थान तर्फे अनेक सामाजिक उपक्रम नेहमीच राबवण्यात येतात, तसेच त्यांच्या मरणोत्तर देहदान, महारक्तदान शिबीर, मोफत ॲम्ब्युलन्स सेवा, दुर्बल घटक पुनर्वसन, मोफत ड्रायव्हिंग स्कूल, मोफत सीबीएससी बोर्ड स्कूल आणि ब्लड इन निड या उपक्रमांचे समाजातून विशेष कौतुक होत आहे.

# शंकर राऊत यांना पुरस्कार प्रदान

। मुरुड जंजिरा । वार्ताहर ।

सामाजिक, शैक्षणिक व भजनाद्वारे जनजागृती करणारे अग्रेसर व्यक्तिमत्व शंकर रामचंद्र राऊत यांना श्री शारदा संगीत पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

खारीक वाडा गावचे माजी पोलीस पाटील व उसरोली ग्रामपंचायतचे तंटामुक्ती अध्यक्ष दामोदर पांडुरंग राऊत यांच्या हस्ते श्री शारदा संगीत पुरस्कार हा शंकर राऊत यांना सन्मानाने प्रदान करण्यात आला. शंकर राऊत यांनी भजनाच्या माध्यमातून त्यांनी अनेक वर्षे समाज प्रबोधन करून अनेक शिष्य निवृत्ती राक्षीकर, अजय राऊत सचिन कोरलेकर तसेच पखवाज वादक सागर राऊत यांच्यासारखे शिष्य घडवले. यावेळी पुरस्कार वितरण झाल्यावर आयोजक सागर राऊत यांच्यामार्फत व ग्रामस्थ मंडळ खारीकवाडातर्फे दिवाळी पहाट हा कार्यक्रम घेण्यात आला. अजय राऊत आणि संदेश भोईर यांनी ‘कानडा राजा पंढरीचा’ या अभंगाच्या माध्यमातून लयकारी आलाप हरकती गाऊन सर्वांना मंत्रमुग्ध करून टाकले. त्यांना पखवाजाची साथ सागर राऊत आणि तबल्यावर सोहन बाईक यांनी दिली.

# दहावीच्या विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा

## ४० वर्षांनी जुन्या आठवणींना उजाळा



। मुरुड । प्रतिनिधी ।

मुरुडमधील सर एसए हायस्कूलच्या इयत्ता दहावीच्या १९८४ सालच्या सुमारे ३० विद्यार्थ्यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून ४० वर्षांनी एकत्र येऊन तालुक्यातील बारशीव येथील एका रिसॉर्टवर स्नेहसंमेलन आयोजित केले होते. दरम्यान, भारावलेल्या विद्यार्थ्यांनी जुन्या आठवणींना उजाळा देत एकमेकांविषयी माहिती जाणून घेतली.

१९८४ साली दहावीत शिकत असलेले हे विद्यार्थी सर्वगुणसंपन्न होण्यास शाळेची कडक शिस्त, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी पोषक वातावरण, विद्यार्थी हितासाठी झटणारे शिक्षक या सर्व जमेच्या बाजूंनी सर्वच विद्यार्थ्यांनी विविध क्षेत्रात आपली वेगळीच ओळख निर्माण केली आहे. स्नेहमेळाव्याच्या सुरूवातीला नुकतेच निधन झालेले स्नेही अण्णा वाडकर यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. त्यानंतर शालेय जीवनातील विविध खेळ, गाणी, भेटवस्तूंचे वाटप करून स्नेहभोजनावर यथेच्छ ताव मारण्यात आला.

कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी संतोष महाडिक, विवेक आंबुर्ले, संदेश कासेकर, किशोर ठाकूर, वृषाली भुस्कुटे, संजय मिरजकर व मेळाव्यासाठी बंगळुरू येथून उपस्थित राहिलेली माजी विद्यार्थिनी सरिता नायक यांचा विशेष सत्कार करण्यात आला. यावेळी प्रमुख उपस्थितांमध्ये संदीप जठारी, किरण रोटकर, सतीश आंबुर्ले, श्रीकांत खोत, मेघा आंबुर्ले, निशा म्हात्रे, प्रभा पाटील, रमण विहूरकर, संदीप गुरव, विलास जामकर, जयराम निशानदार, सुरेंद्र किल्लेकर, ज्योती आपटे, वंदना केळकर, राजेंद्र कौलकर, प्रशांत कौलकर, वनिता जाधव, कल्पना साखरकर इत्यादी उपस्थित होते.

# रखडलेल्या रस्त्यांची कामे लवकरच सुरु होणार

। नेरळ । प्रतिनिधी ।

**शासनाचे सर्वोच्च न्यायालयात प्रतिज्ञापत्र सादर**



### या रस्त्यांची कामे रखडली

**माथेरान शहरातील मुंबई महानगर परदेश विकास प्राधिकरण यांच्याकडून सुरु असलेल्या दस्तुरी ते छत्रपती शिवाजी रोड हा महात्मा गांधी रस्ता तसेच शहरातील एनसी शहा ते विठ्ठल मंदिर पंचवटी नगर रस्ता, आचार्य अत्रे रस्ता (इन्स्पेक्शन बंगला ते शार्लोट लेकीनाक्याकडे जाणारा रस्ता), किंग एडवर्ड रोड ते सुमती विलास नाका ते बार हाऊस नाक्याकडे जाणारा रस्ता, लोअर लुईजा रोड ते हनिमून पॉईंटकडे जाणारा लँडस्केप पॉईंट रोड, छत्रपती शिवाजी महाराज रोड व गुलिस्तान बंगला नाका फाउंटन लॉज नाक्याकडे जाणारा रस्ता, रिगल नाका ते शब्बीर बिर्याणीवालाकडे जाणारा रस्ता, आचार्य अत्रे जंक्शनकडे जाणाऱ्या ब्राइटलँड हॉटेल बॅक साईड गेट क्रमांक २ चा रस्ता, अप्पर लुईजा हनिमून पॉईंट जंक्शनची दुरुस्ती व बांधकाम कोरोनेशन पॉईंटकडे जाण्यासाठी रस्ता, नाका रोड व जहांगीर माणिकजी जंक्शनकडे जाण्यासाठी पिसरनाथ वल्ली रोड फाउंटन लॉज नाका बांधकाम व दुरुस्ती करणे आणि कोतवाल रोड व आकाशगंगाकडे जाणारा पॅनोरमा हॉटेल नाका दुरुस्ती आणि बांधकाम करणे.**

माथेरान शहरातील क्ले पेव्हर ब्लॉक यांच्या रस्त्यांना सर्वोच्च न्यायलयाने फेब्रुवारी २०२२ मध्ये स्थगिती दिली होती. मात्र, क्ले पेव्हकर ब्लॉकचे फायदे लक्षात घेऊन सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाने महाराष्ट्र शासनाने अहवाल तयार करून सर्वोच्च न्यायालयात सादर केला आहे. दरम्यान, माथेरानमधील लाल मातीच्या रस्त्यांच्या मजबुतीसाठी त्यावर मातीचे ब्लॉक लावण्यात येणे गरजेचे आहे, असा अहवाल रायगड जिल्हाधिकारी यांनी महाराष्ट्र शासनाकडे केला आहे.

माथेरान शहरातील लाल मातीच्या रस्त्यावर क्ले पेव्हर ब्लॉक लावण्याच्या कामांना सर्वोच्च न्यायालयाने विरोधी तक्रारी आल्यानंतर स्थगिती दिली होती. माथेरान शहर या हिल स्टेशन येथील बाजार परिसरात मातीचा पेव्हर ब्लॉक रस्ता असल्यास ई-रिक्षा सेवा २४ तास रुग्णांसाठी शकतात आणि त्यामुळे वैद्यकीय उपचारांसाठी उपलब्ध असे यासाठी माथेरान गिरिस्थान नगरपरिषद यांच्याकडून मुंबई आयआयटीकडे माथेरान शहरात लाल मातीच्या रस्त्यांचा अभ्यास केला. मुंबई आयआयटी यांच्याकडून तज्ज्ञ अभियंते यांच्या माध्यमातून शहरात विविध भागात फिरून अभ्यास केला गेला. त्यात उतार असलेल्या भागात, पायाच्या हालचालींना अतिरिक्त निष्क्रिय समर्थनासाठी सपाट रंबल रबरच्या पट्ट्या दिल्या जाऊ शकतात. हिल स्टेशनमध्ये मातीचे पेव्हर ब्लॉक वापरात गेल्यास येथील रस्ते आणखी मजबूत होतील असा अहवाल सादर केला होता. त्या अहवालाच्या आधारे शासनाचे वतीने रायगड जिल्हाधिकारी यांनी क्ले पेव्हर ब्लॉकची गरज असल्याचे मान्य करीत सर्वोच्च न्यायालयात प्रतिज्ञापत्र सादर करण्यात आले.

## पान १ वरून

### महेश बालदींनी माफी मागावी

समाजात पसरली आहे. बालदी यांच्या या वक्तव्यांमुळे भूमीपुत्रांच्या अस्मितेला धक्का पोहोचला आहे. या दोन्ही वक्तव्यासंबंधी महेश बालदी यांनी जाहीर माफी मागावी, असे अखिल आगरी समाज परिषदेने त्यांना सुचविले आहे.

### रस्त्याच्या संरक्षक भिंतीचे काम कागदावरच

समाज मोठ्या प्रमाणात आहे. मोलमजुरी करून ही मंडळी त्यांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवत आहे. डोंगरभागातील सागवाडीकडे जाणाऱ्या रस्त्याला २०२२-२३ मध्ये संरक्षक भिंत मंजूर केल्याचा दावा आमदार महेंद्र दळवी यांनी केला. परंतु, आजपर्यंत या रस्त्याला साधा दगडही लावण्यास आमदार उदासीन ठरले आहे. त्यामुळे आमदारांच्या या भूमिकेबाबत अनेकांकडून नाराजीचे सूरही उमटत आहेत. दहा लाख रुपयांचा निधी मंजूर होऊनही संरक्षक भिंतीचे काम आजही लाल फितीत अडकल्याचे चित्र दिसून येत आहे. तसेच बेलोशी येथील स्मशानभूमीचे सुशोभिकरण करण्यासाठी पाच लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला. मात्र, अजूनपर्यंत सुशोभिकरण झाले नसल्याचे तेथील स्थानिकांकडून सांगण्यात आले आहे.

### जिल्हाभरात भातकापणीला वेग

भागात पाणी साचले. त्यात तुडतुड्या व अन्य रोगांचा प्रादुर्भाव वाढला होता. त्यामुळे भातकापणी लांबणीवर गेली. पावसाने विश्रांती घेतल्यानंतर शेतामधील पाणी कमी झाल्यावर शेतकऱ्यांनी कापणीला सुरुवात केली. गेल्या आठ दिवसांपासून जिल्ह्यात भातकापणीला सुरुवात झाली आहे.

सकाळी शेतावर जाऊन शेतकरी भातकापणीची कामे करीत आहेत. आतापर्यंत दहा टक्के कापणीची कामे पूर्ण झाली आहेत. भातकापणीची लगबग सुरू झाली असून, त्याचा वेगही वाढला आहे. शेतकरी भातकापणीच्या कामात मग्न झाले आहेत. काही ठिकाणी कापणी केल्यावर जागेवर झोडणीची कामे केली जात आहेत. तर काही ठिकाणी कापणी करून चार ते पाच दिवस उन्हात रोपे तापवून झोडणीची कामे करणार आहेत.

**मजूर मिळणे कठीण**

**गावातील स्थानिक मजूर काम करण्यास दुर्लक्ष करीत आहेत. त्यामुळे स्थानिक मजूर मिळणे कठीण झाले आहे. वेगवेगळ्या भागातून मजूर बोलावले जात आहे. विशेष म्हणजे, आदिवासीवाड्यांमधील मजुरांकडून कापणीची कामे करून घेतली जात आहे.**

### चिऊताई, विजयी भवः!

बाळाराम नाईक, ग्रा.पं.चे माजी सदस्य शशिकांत म्हात्रे यांच्या दुकानात, सागमळा येथील विलास नाईक, तुलाडदेवी आदेश काशिनाथ नाईक, नितीन पराड, श्री. ठाकूर, टेकाळकर आळीत सुजय टेकाळकर, भाटगल्लीत रमेश म्हात्रे गुरजी, आर. के. मेमन, सराईमध्ये अनिल तुरे, चौल भगवती येथे प्रशांत वर्तक, आशिष पाटील, चौलनाका येथे पोवळे सर, प्रशांत जाधव, रोहिदास म्हात्रे, चुने कोळीवाडा, काटकर आळी, शितळादेवी मंदिर, आग्राव कोळीवाडा, जानवीचे तळे आदी ठिकाणच्या ज्येष्ठांचे आशीर्वाद घेऊन पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या भेटी घेतल्या. यावेळी ठिकठिकाणी त्यांचे ग्रामस्थांच्या वतीने फटाके फोडून आणि औक्षण करुन जंगी स्वागत करण्यात आले.

चित्रलेखा पाटील यांनी उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर पहिल्यांदाच चौल विभागातील गावांना भेटी दिल्या. ज्यांच्या आशीर्वादाने हा प्रवास इथपर्यंत आला आहे, त्यांचे आशीर्वाद घेणे हे आपले कर्तव्य असल्याचे यावेळी चित्रलेखा पाटील यांनी सांगितले. ज्या पद्धतीने आपण याअगोदर मला आपले मानत आशीर्वाद दिलेत, तसेच आताही माझ्या पाठीशी खंबीरपणे सर्वांनी उभे राहावे, असे आवाहनही त्यांनी सर्वांना केले.

या गावभेटी दौऱ्याप्रसंगी चौल विभागप्रमुख अरविंद शिवलकर, जयंत नाईक, आर.डी. नाईक सर, किशोर घरत, विजय ठाकूर, एस.पी. ठाकूर, राजेंद्र ठाकूर, रमेश म्हात्रे सर, काशिनाथ घरत, विनोद ठाकूर, शैलेश नाईक, महेंद्र नाईक, महेश पाटील, हेमंत (पप्पू) पाटील, अमित फुंडे, राहुल नाईक, उदय नाईक, अनिल तुरे, प्रशांत जाधव, वंदेश तेलंगे, गोरख डोयले, कुंदन भगत, रजनी अधिकारी, रोशन ठाकूर आदींसह पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### विक्रेत्यांकडून एक्स्पायरी डेट टाकण्याच्या नियमाला बगल

लाडू, जिलेबी, कलाकंद, गुलाबजाम यांसह विविध प्रकारची मिठाई खुल्या पद्धतीने विकली जाते. ती ग्राहकांना दिसावी म्हणून काऊंटरमध्ये आकर्षकपणे मांडलेली असते. मात्र, ती कधीपासून ठेवलेली असते, याबाबत ग्राहकाला माहिती नसते. ती शिळी असल्यास ग्राहकांच्या आरोग्याला त्यापासून धोका उद्‌भवू शकतो. त्यामुळे खुल्या मिठाईवर बनविण्याच्या तारखेसह ती कधीपर्यंत वापरावी याचा उल्लेख करणे बंधनकारक केले आहे. ग्राहकांना सुरक्षित अन्नपदार्थ मिळावेत, यासाठी अन्न आणि सुरक्षा मानक प्राधिकरणाने हा निर्णय जाहीर करूनदेखील दुकानदार मात्र या निर्णयाची अंमलबजावणी योग्य रीतीने करत नसल्याने अशा दुकानदारांवर कारवाई होणे गरजेचे आहे.

### नवमतदारांसह ज्येष्ठ ठरणार निर्णायक

मतदार संघात २४ लाख ६८ हजार १२० मतदार आहेत. त्यामध्ये युवा, महिला व ८५ वर्षावरील मतदारांची महत्वपूर्ण भूमिका राहणार आहे. जिल्हयामध्ये १८ ते १९ वयोगटातील ५१ हजार ६१२ तसेच ८५ वर्षापूढील ३५ हजार ८५९ मतदार आहेत. हे मतदार निर्णायक ठरणार आहेत. त्यामुळे कोणाला युवा पिढीसह ज्येष्ठ नागरिकांचा कौल मिळणार याकडे लक्ष लागून राहिले आहे.




# दिवाळी पहाट कार्यक्रमाने गावपण जागवले

## प्रा.एल. बी पाटील यांचे प्रतिपादन

। चिरनेर । प्रतिनिधी ।

जनसेवेतून आनंद देणाऱ्या वशेणी इतिहास संपादकीय मंडळ प्रस्तुत दिवाळी पहाट २०२४ हा कार्यक्रम नुकताच उरण तालुक्यातील वशेणी गावात पहिल्यांदाच संपन्न झाला.

या कार्यक्रमाच्या उद्‌घाटनप्रसंगी रायगड भूषण प्रा.एल बी पाटील, मधुबन कट्टा अध्यक्ष रामचंद्र म्हात्रे, वशेणी गावच्या सरपंच अनामिका म्हात्रे, ग्रामपंचायत सदस्य प्रिती पाटील, साहित्यिक ए.डी. पाटील, मधुबन कट्टा अध्यक्ष रामचंद्र म्हात्रे, साहित्यिक नरेश गणपत पाटील, संजय होळकर, अजय शिवकर, हसुराम म्हात्रे, सुरेंद्र म्हात्रे, निलेश म्हात्रे, डॉ. संचित गावंड, डॉ. कुंजवी म्हात्रे आदी मान्यवर उपस्थित होते.

दिवाळी पहाट या कार्यक्रमात उरण, पेण, पनवेल आणि ठाणे परिसरातील गौरी कोरगावकर, हर्षाली म्हात्रे, सानिका पाटील, रमेश थवई, संदीप गावंड, रमणिक म्हात्रे, रमण पंडित, शिवपार्वती भजन मंडळ, भक्ती ठाकूर, रवींद्र खोत, गणेश खोत, गौरीश पाटील,किशोर पाटील, अक्षता गोसावी, अनिल भोईर आणि बासरी बादक प्रकाश बागडे या कलाकारांनी दीपावली आणि भारतीय संस्कृती जतन करणारी सुरेल गीते सादर करून रसिक वर्गाला मंत्रमुग्ध केले.

दिवाळी पहाट कार्यक्रमाचे औचित्य साधून छोट्या पडद्यावर आणि चित्रपटसृष्टीत नावारूपाला येऊ पाहणारी वशेणी गावची भूमीकन्या अभिनेत्री प्रज्ञा प्रमोद म्हात्रे हिचा सन्मान करण्यात आला. यावेळी रायगडभूषण प्रा.एल बी पाटील यांनी वशेणी इतिहास संपादकीय मंडळाचे कौतुक केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मंडळाचे कार्यवाहक मच्छिंद्रनाथ म्हात्रे यांनी केले. या कार्यक्रमास शर्मिला गावंड, अनिल महाराज, निळकंठ महाराज, नंदकुमार महाराज, सेवानिवृत्त प्रा. गणपत ठाकूर, सदाशिव पाटील, संजय होळकर, संजीव पाटील, जीवन गावंड, प्रसाद पाटील, शाम ठाकूर, कृष्णा ठाकूर, रेवती गावंड, गणेश म्हात्रे, जयंता पाटील, संग्राम पाटील, प्रीतम म्हात्रे आदी मान्यवर उपस्थित होते.

निवडक

## विद्यार्थ्यांनी बनवले कंदील

**पाली/गोमाशी :** रायगड जिल्हा परिषद नवघर शाळेत दिवाळी निमित्त विद्यार्थ्यांनी कंदील तयार करून आनंद घेतला. या उपक्रमात शाळेतील सर्वच विद्यार्थ्यांनी मोठया उत्साहात सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी विविध आकाराचे कंदील व पणत्या तयार केले. या उपक्रमासाठी पालकांनी सुद्धा छान सहकार्य केले. बाजारातून कंदील विकत घेण्यापेक्षा आपण सुद्धा सुंदर कंदील बनवू शकतो हा विश्वास विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करणे या मुख्य हेतूने हा उपक्रम आयोजित करण्यात आला होता.

## निवडणुकीसाठी पोलीस सज्ज

**पनवेल :** आगामी विधानसभा-२०२४, निवडणुकीच्या अनुषंगाने पनवेल शहर पोलीस ठाणे हद्दीतील खालचा ओवळा गाव, पारगाव, दापोली, डुंगी गाव परिसर येथे एस.एस.बी.चे १ पोलीस निरीक्षक, ०२ पोउपनि व ४८ जवान तसेच पोलीस ठाणे चे ०१ पोनि, ०४ सपोनि, पोउपनि २५ पोलीस अंमलदार यांनी परिसरातील महत्त्वाची मतदान केंद्रे तसेच निवडणुकीच्या अनुषंगाने महत्वाची ठिकाणी रूट मार्च करून पायी भेटी देऊन, त्यांना परीसर व परीस्थितीची माहिती देण्यात आली.

## 'मुक्या प्राण्यांना जपा'

**पनवेल :** दिवाळी सण साजरा करीत असताना मोठ्या प्रमाणात फटाके व आतषबाजी करण्यात येते. हे करताना मुक्या प्राणीमात्रांच्या जीवाला हानी होणार नाही याची दखल घ्यावी, असे आवाहन होपेसो फाऊंडेशनच्या वतीने नागरिकांना करण्यात आले आहे. मोहनिष भोईर आणि कोमल भोईर यांनी हिंदू सण उत्साहात आणि स्वतची काळजी घेऊन पार पाडावा आणि प्राणीमात्रांना हानी होणार नाही याची दखल नागरिकांनी घ्यावी, असे आवाहन या निमित्ताने करण्यात आले आहे.

## पोलिसांचा रूट मार्च

**नेरळ :** नेरळ बाजारपेठ आणि परिसरात पोलिसांनी रूट मार्च काढून सशस्त्र शक्ती प्रदर्शन केले. नेरळ पोलीस ठाणे अंतर्गत ६० गावे आणि वाड्यांचा समावेश आहे. सध्या विधानसभा निवडणुकीचे वारे वाहत असून २० नोव्हेंबर रोजी विधानसभेची निवडणूक आहे. या निवडणुकीसाठी जनतेच्या मनात कोणत्याही प्रकारची भीती असू नये यासाठी नेरळ पोलिसांकडून शक्ती प्रदर्शन करण्यात आले. यावेळी पोलिसांनी नेरळमध्ये रूट मार्च काढला.

## पायी दिंडीचे प्रस्थान

**कोलाड :** रोहा तालुक्यातील कोलाड विभाग व श्री क्षेत्र गांधारपाले, महाड यांच्या संयुक्त विद्यमाने ९३ वर्षांपासून ही रायगड दिंडी सुरु आहे. दिंडीचे संचालक राम महाराज आंबेकर व रायगड दिंडी कार्यकारिणी मंडळ यांच्या नेतृत्वाने यावर्षी आश्विन कृ. १४ सकाळी ७ वाजता पुई कोलाड येथून माझे जिवाचे आवडी, पंढरपूर नेईन गुढी, तरीच जन्मा यावे दास विठ्ठलाचे व्हावे या विठ्ठल नामाच्या ओवी प्रमाणे टाळमृदुंग व नामाच्या गजरात पायी दिंडीचे प्रस्थान झाले आहे.

# वातानुकुलित एसटीतील प्रवासी घामाघुम

## बंद पडलेल्या एसीचा फटका; प्रवाशांमध्ये संताप

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

**सुखकर व आरामदायी प्रवास करण्यासाठी एसटी महामंडळाच्या ताफ्यात शिवशाही एसटी बसेस दाखल झाल्या आहेत. परंतु या बसेसच्या बिघाडाचा फटका कायमच प्रवाशांना बसत आला आहे. गुरुवारी दुपारी पनवेल– अलिबाग विना थांबा शिवशाही एसटी बसचे एसीमध्ये बिघाड झाला. त्यामुळे तब्बल पावणे दोन तास वातानुकुलित एसटीतील प्रवाशांचे प्रचंड हाल झाले. एसटी पूर्णपणे बंद असल्याने सर्वजण घामाघुम झाले. एसटी महामंडळाच्या या कारभाराबाबत प्रवाशांनी तीव्र संताप व्यक्त केला.**



मुंबइ, ठाणे, बोरीवली अशा अनेक मार्गावर जाणाऱ्या प्रवाशांसाठी अलिबाग एसटी बस आगारामार्फत शिवशाही एसटी बस सेवा सुरु करण्यात आली आहे. वातानुकुलित असलेल्या या एसटी बसला प्रवाशांकडून प्रचंड मागणी वाढली आहे. शिवशाही बसमधून अलिबाग-पनवेल अवघ्या दीड ते पावणे दोन तासात आरामात पोहचता येते. विना थांबा शिवशाहीमधून प्रवास करण्यावर प्रवासीदेखील भर देत आहेत. दोन तासांचा प्रवास अवघ्या दीड ते पावणे दोन तासांत होत असल्याने प्रवाशांच्या वेळेची बचत होत आहे. अलिबाग ते पनवेल शिवशाही वातानुकुलित एसटी बसचे तिकीट १३० रुपये आहे. साध्या बसपेक्षा ४० रुपयांनी अधिक आहे. तरीदेखील प्रवासी ज्यादा पैसे मोजून शिवशाहीतून प्रवास करीत आहेत. परंतु शिवशाही एसटीच्या बिघाडाचा फटका वारंवार बसत असल्याचे चित्र आहे. कधी एसी बंद तर कधी एसी अधिक असा प्रकार अनेक वेळा प्रवाशांनी अनुभवलेला आहे. पनवेलहून गुरुवारी सकाळी साडेअकरा वाजण्याच्या सुमारास प्रवाशांना घेऊन विनाथांबा शिवशाही वातानुकुलित एसटी बस अलिबागकडे निघाली. परंतु या एसमधील एसीच बंद पडला होता. त्यामुळे एसटीतील प्रवासी घामाघुम झाले. अनेकांचा श्वास कोंडण्याची परिस्थिती निर्माण झाली होती. अखेर प्रवाशांनी संताप व्यक्त करीत बसमधील दरवाजा उघडा ठेवण्याची मागणी केली. त्यानंतर चालकाने दरवाजा उघडा ठेवला. महामंडळाच्या कारभाराबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली. तब्बल दीड ते दोन तासाच्या प्रवासात एसीविना प्रवासी त्रस्त झाले होते.

> **शिवशाही एसटी बसमधील प्रवाशांना चांगली सुविधा मिळावी, यासाठी प्रयत्न कायमच राहिला आहे. एसी बंद, चालू असल्याची खात्री करूनच चालकाने वाहन बाहेर काढावे. प्रवाशांची गैरसोय होणार नाही याची काळजी घ्यावी, अशी सुचना संबंधित चालकांना देण्यात आली असून कार्यशाळेतील कर्मचाऱ्यांनादेखील सूचना केली आहे. पुन्हा शिवशाही बसमधील प्रवाशांची गैरसोय झाल्याची तक्रार आल्यास तात्काळ कारवाई केली जाईल.**
> **–राकेश देवरे, आगार व्यवस्थापक, अलिबाग एसटी बस आगार**

# निवडणूक निरीक्षकांनी घेतला निवडणूक कामकाजाचा आढावा

**। रायगड । प्रतिनिधी ।**



जिल्ह्यातील सात विधानसभा मतदारसंघासाठी केंद्रीय निवडणूक आयोगाने नियुक्त निवडणूक निरीक्षक यांनी जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत निवडणुकीच्या तयारीचा आढावा घेतला.

निवडणूकीची सर्व प्रक्रिया निर्भय, भयमुक्त आणि पारदर्शक वातावरणात पार पडण्यासाठी सर्व नोडल अधिकाऱ्यांनी सोपविलेली जबाबदारी व्यवस्थितपणे पार पाडावी, असे सर्वांनी यावेळी स्पष्ट केले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात आयोजित विधानसभा निवडणूक कामकाज आढावा बैठकीला निवडणूक निरीक्षक (सामान्य) दुनी चंद राणा, संतोष कुमार राय, रुही खान, सतीश कुमार एस, पोलीस निरीक्षक स्वप्नील ममगाई, खर्च निरीक्षक राजेश कुमार, ज्योती मीना, पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ भरत बास्टेवाड यांसह सर्व नोडल अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्री जावळे यांनी निवडणुकीच्या दृष्टीने करण्यात येत असलेल्या काम काजाचीमाहिती दिली.स्थिर पथके व फिरती पथके आवश्यक त्या ठिकाणी उपलब्ध आहेत. आंतरराज्य व जिल्ह्याच्या सीमेवर पुरेसा पोलीस व निवडणुक यंत्रणाचा कर्मचारी वर्ग २४ तास तपासणी नाक्यावर उपस्थित आहे. बॅरिकेट्स व सीसीटीव्हीची व्यवस्था करण्यात आली असून अधिकारी व कर्मचारी प्रत्येक वाहनाची तपासणी करून रोख रक्कम, मद्य वाहतूक होत आहे का तसेच संशयास्पद बाबीवर लक्ष ठेवणार असल्याचे त्यांनी सांगितले. जिल्ह्यातील मतदार संघातील मतदान केंद्र, मतदार, क्रिटिकल मतदान केंद्र, मतदान प्रक्रियेसाठी लागणारे मनुष्यबळ, क्षेत्रीय वाहतूक नियोजन याबाबतची माहिती जावळे यांनी यावेळी दिली.

निवडणूक निरीक्षकांनी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीच्या अनुषंगाने आयोगाच्या निर्देशांनुसार अपेक्षित कार्यवाही याबाबत मार्गदर्शन केले व आवश्यक त्या सूचना दिल्या. तसेच सर्व नोडल अधिकारी यांच्याकडून निवडणुकीच्या तयारीची माहिती जाणून घेतली.

# बलात्काराचा गुन्हा दाखल

**। नवीन पनवेल । वार्ताहर ।**

जबरदस्ती करून लग्नाचे आमिष दाखवून ४१ वर्षीय महिलेला गुंगीचे औषध दिले आणि चार चाकी वाहनात आणि क्रांतिवीर लॉज शिरढोण येथे जबरदस्तीने शारीरिक संबंध प्रस्थापित केल्याप्रकरणी आरोपी सुनील भोईर याच्या विरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

२०20 मध्ये व्हॉट्सअप ग्रुप द्वारे सुनील भोईर आणि पीडित महिलेची ओळख झाली. त्यानंतर त्यांच्यात चॅटिंग चालू झाली. यावेळी सुनील यांनी त्यांना लग्नाची ऑफर दिली. काही दिवसांनी सुनील यांनी पीडित महिलेला गाडीमध्ये बसवून जबरदस्तीने शारीरिक संबंध केले. यावेळी त्याला विरोध केला असता पिडीतेला लग्न करण्याचे आमिष दाखवले. तसेच तो पीडित महिलेला सरबतातून गुंगीचे औषध देत असल्याचे पीडितेचे म्हणणे आहे. त्यानंतर क्रांतिवीर लॉज शिरढोण येथे नेऊन जबरदस्तीने शारीरिक संबंध ठेवले. त्याच्याकडे पीडितेने लग्न करण्याबाबत विचारणा केली असता वेगवेगळी कारणे सांगून टाळू लागला. आणि त्यानंतर संपर्क तोडला. याप्रकरणी सुनील भोईर याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस अधिक तपास करत आहेत.



● विधानसभा निवडणुकीत आचारसंहिता भंग होऊ नये त्याचबरोबर वाहनांमधून होणारी अवैद्य दारूची आणि पैशांची वाहतूक रोखण्यासाठी चेकपोस्टवर निवडणूक विभागाकडून व्हीएसटी पथक तैनात करण्यात आले आहेत. पेण-अलिबाग मार्गांवरील पेझारी येथील चेकपोस्टवर वाहनांची व्हिडीओ शुटिंगसह तपासणी करणारे पथक ( समीर मालोदे )

# सुतारवाडीत पायी दिंडीचे स्वागत

**। सुतारवाडी । वार्ताहर ।**

सुतारवाडी नाक्यावर येथील ज्येष्ठ व्यापारी मोहन शेठ दोशी यांच्या निवासस्थानी करण्यात आले.

येथे अल्पोपहारानंतर दिंडीने पुढील प्रवासास मार्गक्रमण केले. ही दिंडी खांब ते पंढरपूर या ठिकाणी ३० ऑक्टोबर ते ११ नोव्हेंबर या कालावधीमध्ये पंढरपूर तीर्थक्षेत्राकडे जाणार आहे. या पायी दिंडीचे स्वागत रायगड जिल्ह्यासह पुणे जिल्ह्यातही मोठ्या भक्ती भावाने होत असते. या पायी दिंडीत परिसरातील अनेक भाविक दरवर्षी सहभागी होत असतात. यावर्षीही परिसरातील अनेक भाविक पायी दिंडीत सहभागी झाले आहेत.



# नाईक कुटुंबियांचे चित्रलेखा पाटील यांच्याकडून सांत्वन

**। चौल । प्रतिनिधी ।**



चौलमळा येथील सुवासिनी दत्तात्रेय नाईक यांचे मंगळवारी (दि. २९) वृद्धापकाळाने मुंबई येथे निधन झाले. निधनसमयी त्या ७६ वर्षांच्या होत्या. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख सुरेंद्र म्हात्रे यांच्या त्या सासूबाई होत्या. त्यांच्या निधनाची बातमी समजताच शेतकरी कामगार पक्षाच्या रायगड जिल्हा महिला प्रमुख चित्रलेखा पाटील यांनी नाईक कुटुंबियांचे बुधवारी (दि. ३०) त्यांच्या निवासस्थानी जाऊन सांत्वन केले.

सुवासिनी नाईक ह्या १९६० चे महाराष्ट्र श्री स्व. दत्तात्रेय नाईक (भाऊ) यांच्या पत्नी होत्या. दत्तात्रेय नाईक चौलमळा येथे पंचामृत नावाने व्यायामशाळादेखील सुरू केली आहे. परंतु, भाऊंच्या आकस्मिक निधनानंतर त्यांची आठवण म्हणून संपूर्ण व्यायामशाळेची जबाबदारी त्यांनी आपल्या खांद्यावर घेत आजतागायत व्यायामशाळा सुरू ठेवली आहे. सुवासिनी नाईक यांच्या पश्चात त्यांच्या पाच कन्या अनिता म्हात्रे, रुपाली म्हात्रे, जागृती म्हात्रे, आरती चव्हाण, शमा पावले, जावई, नातवंडे असा मोठा परिवार आहे. सुवासिनी नाईक यांच्या निधनाचे वृत्त समजताच विविध क्षेत्रातील मंडळींनी उपस्थित राहात त्यांच्या पार्थिवाचे अंत्यदर्शन घेतले. त्यांच्या पार्थिवावर चौलमळा येथील अमरधाम स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी उपस्थितांनी त्यांना श्रद्धांजली अर्पण करीत कुटुंबियांचे सांत्वन केले. कै. सुवासिनी नाईक यांचे दिवसकार्य गुरुवार, दि. ७ नोव्हेंबर रोजी, तर उत्तरकार्य (तेरावे) शुक्रवार, दि. ८ नोव्हेंबर रोजी होणार असल्याची माहिती त्यांच्या कुटुंबियांनी दिली.

## 'कुटुंब रंगलंय काव्यात' कार्यक्रमाचे आयोजन

**माणगाव :** कोकण मराठी साहित्य परिषद शाखा माणगाव व नागरिक सेवा फाउंडेशन माणगाव यांच्या संयुक्त विद्यमाने माणगाव येथे प्रतिवर्षी प्रमाणे दिवाळी पहाट कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

दिवाळी पाडवा शनिवारी (दि.२) सकाळी सहा ते आठ या वेळेत कुणबी भवन माणगाव येथे तमाम कविता प्रकारांचा काव्य, गीत, गायन आणि साभिनय सादरीकरणाने नटलेला विश्वविक्रमी जागतिक एकपात्री काव्यनाट्य अनुभव 'कुटुंब रंगलंय काव्यात' या प्राध्यापक विसुभाऊ बापट यांच्या काव्य गायन ,वाचन कार्यक्रमाच आयोजन करण्यात आले आहे.

# मायणी शाळेस ई-लर्निंग किट भेट

**। खरोशी । वार्ताहर ।**



डिजिटल क्रांतीच्या युगात शिक्षणाचे संदर्भ बदलले असून तंत्रज्ञानाच्या सहाय्याने वाडीवस्त्यांवरील विद्यार्थ्यांना शिक्षण घेता यावे या उदात्त हेतूने प्रणवतीर्थ चॅरिटेबल ट्रस्ट व चैतन्य सॉफ्टवेअर, पुणे या सेवाभावी संस्थांकडून मायनी शाळेसाठी ई लर्निंग किट भेट देण्यात आले.त्याचा स्विकार शाळेचे मुख्याध्यापक रामकृष्ण भोईर यांनी केले.

नुकतेच पुणे येथे प्रणवतीर्थ चॅरिटेबल ट्रस्टच्या कार्यालयात हा कार्यक्रम घेण्यात आला. मायणी सह पेण तालुक्यातील सहा व खालापूर तालुक्यातील सहा शाळांना सदर ई लर्निंग किट भेट देण्यात आले.

यावेळी प्रणवतीर्थ ट्रस्टचे शंतनू काळे व चैतन्य सॉफ्टवेअरचे श्री देशपांडे व त्यांचे सहकारी उपस्थित होते. या दोन्ही संस्थांच्या माध्यमातून आतापर्यंत पेण कर्जत खालापूर या तालुक्यातील चाळीस शाळांना ई लर्निंग किट भेट देण्यात आले आहेत. हे साहित्य मिळवून देण्यासाठी प्रगती गावंड व प्रवीण गावंड यांचे विशेष योगदान लाभले.

तबल पाच दिवसांच्या अथक परिश्रमाने साकारला पन्हाळगड किल्ला....

रोह्यातील दिवाळी निमित्ताने

# विद्यार्थी रमले गडकिल्ले निर्मितीत

**। चणेरा । प्रतिनिधी ।**



दिवाळी म्हटलं की महाराष्ट्राची मोठी परंपरा गडकिल्ल्याची प्रतिकृती बनवण्याचीवारसा आजही लहानांपासून ते वडिलधारी मंडळी ने जपलेला आहे. त्यामुळे रायगड जिल्ह्यात दिवाळीत किल्ले बनवण्याचे महत्व काही वेगळच आहे.

नुकत्याच दिवाळी सणानिमित्त पहिला सुट्टीचा फायदा रोहा तालुक्यातील वाशी हद्दीतील शिव समर्थ नगर महादेवाडीतील १० ते १२ चिमुकल्या मुलांनी एकत्र येऊन पन्हाळगड या गडकिल्ल्यांची हुबेहूब अतिकृती तयार केलेली आहे. दहा बाय बारा आशा मोकळ्या जागेत त्या विद्यार्थ्यांनी गड किल्ला उभारला आहे. त्यामुळे या दिवाळीत विद्यार्थ्यांमध्ये मोठा उत्साह निर्माण झाला असून पालक वर्गात मोठा समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

पन्हाळगड किल्ला हा थंड हवेचा ठिकाण म्हणून मानला जातो. त्यामुळे पन्हाळगड किल्ल्याचे प्रतिकृती साकारताना येथील विद्यार्थ्यांनी, ओरिजनल गवताचा वापर केला असून गडकिल्ल्यांच्या सभोवती पूर्णतः हिरवेगार जणू काय डोंगराळ भागच दिसून येत आहे तसेच संभाजी मंदीर, सोमेश्वर मंदीर, तीन दरवाजा, तीन तलाव, मोठी तटबंदी, मावळे, छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा, तोफ अशा अनेक गोष्टी विद्यार्थ्यांनी या गडकिल्ल्यांच्या प्रतिकृती म्हणून पन्हाळा किल्ला साकारलेला आहे.

> **आम्हाला दिवाळी शाळेची सुट्टी पडताच गावातील मुलांनी यावर्षी पन्हाळगड किल्ल्याची प्रतिकृती बनवण्याचे ठरवले. तसे आम्ही दरवर्षीदेखील वेगवेगळे गडकिल्ले सुट्टीत बनवत असतो. गावातील वडीलधारी मंडळींची मदत तसेच इतिहासाच्या पाठ्यपुस्तकातील पन्हाळगड किल्ला बनवण्यासाठी सुरुवात केली. आम्हाला हा किल्ला बनवण्यासाठी पाच दिवस गेले. त्यामुळे या सुट्टीतील आम्हाला आनंद काही वेगळाच होता.**
> **– धृव जाधव, विद्यार्थी (शिव समर्थ नगर )**



आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)


# मिठाई वाटा, पण...

भारतीय सैनिकांनी लडाखच्या सीमेवरील चिनी जवानांना दिवाळीची मिठाई वाटली. गेली चार वर्षे भारत आणि चीनचा लडाख सीमेवर झगडा चालू होता. दोन्ही देशांची सैन्ये लढाईसज्ज अवस्थेत समोरासमोर उभी ठाकलेली होती. आता त्यांना माघारी बोलवावे यावर दोन्ही बाजूंचे एकमत झाले आहे. बुधवारी ही सैन्यमाघारी पूर्ण झाली असे भारतातर्फे जाहीर करण्यात आले. २०२० च्या जून महिन्यात दोन देशांमध्ये युध्द सुरु होते की काय अशी स्थिती निर्माण झाली होती. ते ढग पांगले ही आनंदाची गोष्ट आहे. १९६२ मध्ये अचानक झालेल्या चिनी आक्रमणामुळे भारताचा पराभव झाला होता. मात्र त्यानंतर भारतीय सैन्य कित्येक पटीने शस्त्रसज्ज आणि लढण्यासाठी मजबूत आहे. यावेळीही कोणतेही कारण नसताना चीनने अचानक लडाखमध्ये घुसखोरी केली. मात्र भारतीय सैन्य त्यांना पुरून उरले. त्यांनी त्यांना वेळीच रोखले. आपणा सर्वांसाठी लष्कराची ही अभिमानास्पद कारवाई आहे. चीनसोबत गेल्या चार वर्षात लष्करी आणि मंत्री पातळीवरील चर्चांच्या अनेक फेऱ्या झाल्या. त्यातून माघारीचे तपशील ठरत गेले. मोदी सरकारने पाकिस्तानबरोबरचे संबंध तोडून टाकले आहेत. तसे चीनच्या बाबत करता येत नाही. चीन हा आपल्या कित्येक पट मोठा व सामर्थ्यशाली देश आहे. त्याने आक्रमण केले असले तरी त्याच्याबाबत आपल्याला पडती भूमिका घ्यावी लागेल व चर्चा चालू ठेवावी लागेल हे मोदी सरकारला कळले. तिथे भलत्याच राष्ट्रप्रेमाच्या आणि शौर्याच्या गप्पा मारून चालत नाही याची पूर्ण जाणीव आता त्याला झाली असेल अशी आशा आहे. हेच जर काँग्रेसच्या काळात घडले असते तर काँग्रेसी नेतृत्व दुबळे आहे, त्याने चीनसमोर नमते घेतले असे आकांडतांडव मोदींनी केले असते. भविष्यात समजा तसे काही झालेच तर भाजपची प्रतिक्रिया शहाणपणाची व संयमी राहील अशी अपेक्षा आहे.

### चीनकडून पुष्टी नाही

२०२० च्या मे महिन्यात या संघर्षाला प्रारंभ झाला. तेव्हा चिनी सैन्याचे जवान लडाखमधील पाच भारतीय ठाण्यांमध्ये अचानक घुसले. जूनमध्ये हा संघर्ष टोकाला पोचला. चीनने यात आधुनिक शस्त्रे किंवा दारुगोळा वापरण्याचे टाळले. अन्यथा, युध्दच सुरू करण्याला भारताला निमित्त मिळाले असते व कदाचित अमेरिका व इतर देशांनी भारताला पाठिंबा दिला असता. त्यामुळे चिनी सैनिकांनी लोखंडी काटेरी गोळे असलेल्या काठ्या वापरून भारतीय सैनिकांवर हल्ला केला. शिवाय दगडफेक वगैरेही केली. त्यात वीस भारतीय सैनिकांचा मृत्यू झाला. त्यावेळी या भागात प्रचंड बर्फ व थंडी होती. त्यामुळे हा भाग तसा विरळ होता. दोन्हीपैकी कोणतेच जवान येथे गस्त घालत नव्हते. मात्र तेथे चीनने घुसखोरी करून अत्यंत सोईची अशी पाच ठाणी बळकावली. तेथून भारतीय सैन्यावर मारगिरी करणे त्यांना सोईचे जाणार होते. गलवान खोरे, पँगान्ग लेक इत्यादी भागात हे घडले. पण चीनने सरळसरळ घुसखोरी केलेली असूनही नरेंद्र मोदी यांनी परकी देशाचा एकही सैनिक आतमध्ये आलेला नाही अशी भूमिका घेतली. पण मोदी खोटे बोलत आहेत हे अनेक पत्रकार व संरक्षण तज्ज्ञांनी पुराव्यासकट दाखवून दिले. त्यानंतर चीनने हालचाली थांबवल्याने काही काळाने हा वाद थंडावला. मात्र आपली महत्वाची ठाणी त्यांच्याकडेच राहिली. पुढच्या काळात दोन्ही देशांच्या लष्करी अधिकाऱ्यांमध्ये चर्चेच्या २१ फेऱ्या झाल्या. त्यात गलवान खोऱ्यातून चीनने माघार घेतली. पण डेस्पांग व डेमचोक या दोन मोक्याच्या ठिकाणांवरची घुसखोरी त्याने कायम ठेवली होती. आता ताज्या करारानुसार चीनने तेथूनही सैन्य मागे घेण्याचे ठरवलेले दिसते. अर्थात आपले परराष्ट्र सचिव वगैरे याचा मोठा गाजावाजा करीत असले तर चीनने याबाबत कोणतेही अधिकृत निवेदन केलेले नाही हे लक्षात ठेवायला हवे.

### गमावलेली भूमी

लडाखमधील विवादाबाबत चर्चा चालू आहे व काही प्रगती झाली आहे इतकेच चीनने काही दिवसांपूर्वी म्हटले आहे. सैन्यमाघारीची चीनने अधिकृत घोषणा केलेली नाही. त्यामुळे भारत सरकारच्या निवेदनांकडे सावधपणे पाहण्याची गरज आहे. दुसरे म्हणजे भारतीय भूमीतून पूर्णपणे माघार झाली आहे का हेही तपासण्याची गरज आहे. अजय शुक्ला हे माजी लष्करी अधिकारी व पत्रकार आहेत. त्यांनी याबाबत साशंकता व्यक्त केली आहे. गलवान, हॉटस्प्रिंग, गोगरा या भागातून पूर्वी जेव्हा ही माघार झाली तेव्हा दोन्ही सैन्यांच्या मधले काही बफर झोन (कोणाचेच सैन्य नाही व कोणाचीच मालकी नाही असे विभाग) करण्यात आले होते. पण शुक्ला यांच्या म्हणण्यानुसार २०२० पूर्वी भारतीय सैन्य ज्या भागात गस्त घालत होते, म्हणजेच जे भारताच्या अधिपत्याखाली होते तेच आता बफर झोनमध्ये गेले आहेत. याचाच अर्थ भारतीय सैन्य २०२० नंतर मागे रेटले गेले आहे. आता डेस्पांग व डेमचोकमध्ये असाच काही भूभाग आपण गमावला आहे का हा प्रश्न आहे. टेलिग्राफने तेव्हा दिलेल्या वृत्तानुसार चीन तेव्हा सुमारे पंधरा ते अठरा किलोमीटर आतपर्यंत घुसून आला होता व हा किंवा आणखी पंधरा किलोमीटरचा भाग बफर झोन करावा अशी चीनची मागणी होती. त्याबाबत काय निर्णय झाला हे अजून स्पष्ट झालेले नाही. भारताची एक इंचही जमीन शत्रूला देणार नाही असे काल गुजरातमधील सैनिकांसोबतच्या दिवाळी कार्यक्रमात नरेंद्र मोदी म्हणाले. पण प्रत्यक्षात लडाखमध्ये चीनने आपल्याला मागे रेटले आहे ही वस्तुस्थिती ते दडवत आहेत. याबाबत संसदेत चर्चा करायलाही ते तयार नाहीत. चीनची आर्थिक स्थिती सध्या चांगली नाही. त्याच्या हिशेबाने २०२० मध्ये भारताला एक इशारा देऊन झाला आहे. तूर्तास तो अधिक पुढे येऊ इच्छित नाही. त्यामुळे त्याने हा तात्पुरता तह केलेला असू शकतो. आपला जय झाल्याचे भासवण्यासाठी मिठाया वाटणे मोदींच्या सोईचे आहे. पण आपण हा जल्लोष करणे हे घाईघाईचे व आत्मघातकी ठरू शकते.

विचार

# गृहोपयोगी घट, अंबानी-बीएसएनएलची वट

**दिवाळीचा माहोल अर्थव्यवस्था घुसळून काढत आहे. या टप्प्यावर गृहोपयोगी वस्तूंच्या खपात मोठी घट अनुभवायला मिळाली आहे. याच सुमारास 'बीएसएनएल'च्या ग्राहकसंख्येत साठ लाखांची तगडी वाढ झाली आहे. दरम्यान, मुकेशभाई अंबानी आता स्वस्त धान्यांच्या दुकानांचे नेटवर्क उभे करणार असल्याची बातमी आहे. आणखी एक लक्षवेधी बातमी म्हणजे देशात डिजिटल पेमेंटच्या वापरात वाढ होत आहे.**

महेश देशपांडे

दिवाळीचा माहोल अर्थव्यवस्था घुसळून काढत असताना उण्या अधिक बातम्यांचीही सद्दी अनुभवायला मिळत आहे. या शृंखलेतील ताजी बातमी म्हणजे अर्थनगरीमध्ये गृहोपयोगी वस्तूंच्या खपात मोठी घट अनुभवायला मिळाली आहे. याच सुमारास 'बीएसएनएल'च्या ग्राहकसंख्येत मात्र साठ लाखांची तगडी वाढ झाली आहे. दरम्यान, मुकेशभाई अंबानी आता स्वस्त धान्यांच्या दुकानांचे नेटवर्क उभे करणार असल्याची बातमी आहे. याच टप्प्यावर देशात डिजिटल पेमेंटच्या वापरात वाढ होत आहे.

जादा महागाईमुळे शहरी भागातील गृहोपयोगी वस्तूंच्या आणि खाद्यपदार्थांच्या मागणीवर परिणाम होत आहे. देशातील आघाडीच्या गृहोपयोगी वस्तूंच्या उत्पादक दोन कंपन्यांनी २०२४-२५ च्या दुसऱ्या तिमाहीचे निकाल जाहीर केले आहेत. त्यांच्या नफ्यात घट झाली आहे.हिंदुस्तान युनिलिव्हर लिमिटेडने निकाल जाहीर केले आणि त्यानुसार दुसऱ्या तिमाहीमध्ये कंपनीच्या नफ्यात चार टक्क्यांनी घट झाली आहे. त्यामुळे गेल्या आठवड्यात 'नेस्ले इंडिया'ने त्याचे निकाल जाहीर केले होते. या कंपनीच्या नफ्यामध्ये ०.९४ टक्के घट झाली होती. शहरांमध्ये गृहोपयोगी वस्तूंची मागणी कमी झाली आहे. या कंपन्यांचे व्यवस्थापनही मागणीमध्ये घट स्वीकारत आहे. 'हिंदुस्तान युनिलिव्हर लिमिटेड'चे सीईओ आणि कार्यकारी संचालक रोहित जावा म्हणाले, की सप्टेंबर तिमाहीमध्ये शहरी बाजारपेठेत गृहोपयोगी वस्तूंची मागणी कमी झाली आहे, तर ग्रामीण भागात मागणी वाढली आहे.

ते म्हणाले की ग्राहकांच्या मागणीमध्ये हळूहळू होत असलेल्या बदलांवर आम्ही बारीक लक्ष ठेवून आहोत. दुसऱ्या तिमाहीमध्ये 'हिंदुस्तान युनिलिव्हर लिमिटेड' चा निव्वळ नफा २६१२ कोटी रुपये होता. २०२३-२४ च्या दुसऱ्या तिमाहीमध्ये तो २७१७ कोटी रुपये होता. मध्यमवर्गीय खर्चात कपात करतात. शहरी भागात 'नेस्ले इंडिया'चीही मागणी कमी होत आहे. 'नेस्ले इंडिया'ची कामगिरी जुलै-सप्टेंबर या तिमाहीमध्ये गेल्या आठ वर्षांमधील सर्वात कमी राहिली. शहरी भागात राहणाऱ्या मध्यमवर्गीयांनी आपल्या खर्चात कपात केली आहे. त्याचा सर्वाधिक परिणाम दूध आणि चॉकलेट विभागावर झाला आहे. 'नेस्ले इंडिया'चे अध्यक्ष आणि कार्यकारी संचालक सुरेश नारायण म्हणाले की प्रीमियम वस्तूंचा खप मजबूत आहे; पण मध्यम सेगमेंटमध्ये मागणी कमी होत आहे.सुरेश नारायण म्हणाले की, हाती पैसा राखून असणारे प्रचंड खर्च करतात; पण मध्यमवर्गीयांना ते परवडत नाही. अनेक कंपन्या मध्यमवर्गाला लक्ष्य करत असून वाजवी किंमतीत वस्तू देत आहेत. त्यांना तात्पुरत्या समस्यांचा सामना करावा लागत आहे. बहुतांश एफएमसीजी कंपन्यांना समस्या येत आहेत. कारण मध्यमवर्ग अडचणीत आहे. पूर्वी केवळ एका तिमाहीमध्ये कमकुवत मागणी असायची; परंतु आता मागणीमध्ये सतत २-३ तिमाहींमध्ये घट दिसून येत आहे. असे असले तरी दीर्घकालीन मागणीत सुधारणा होईल, अशी अपेक्षा आहे.

आता बातमी बीएसएनएलच्या कामगिरीची. जुलै महिन्यात खासगी टेलिकॉम कंपन्यांनी त्यांच्या प्लॅन्सच्या किंमतीमध्ये मोठी वाढ केली. सर्वच कंपन्यांचे कॉलिंग, डेटा प्लॅन महागले. त्यानंतर देशात त्यांच्यावर बहिष्कार टाकण्याची एकच लाट आली आणि ग्राहकांनी 'बीएसएनएल'कडे मोर्चा वळवला. परिणामी, 'बीएसएनएल'च्या ग्राहकसंख्येमध्ये अचानक मोठी वाढ झाली. आता सरकार या सर्व बदलामुळे उत्साहित आहे. 'बीएसएनएल' मध्ये आमुलाग्र बदल करण्याची तयारी सुरू झाली आहे. 'बीएसएनएल' लवकरच 'फाईव्ह जी' सेवा पुरवणार आहे. इतकेच नाही तर, लागलीच 'सिक्स जी' सेवेची चाचपणीही करण्यात येणार आहे. त्यासाठीचे प्रयोग सुरू झाले आहेत. असे झाले तर जगात सर्वाधिक गतीने इंटरनेट सेवा पुरवणारी 'बीएसएनएल' ही जगातील पहिली सरकारी कंपनी ठरू शकेल. दूरसंचार मंत्री ज्योतिरादित्य शिंदे यांनी हा बदल घडवून आणण्याची तयारी केली आहे. सार्वजनिक क्षेत्रातील सर्वात मोठी टेलिकॉम कंपनी बीएसएनएल गेल्या दोन वर्षांपासून नव्याने ठसा उमटवू पहात आहे. 'बीएसएनएल'मध्ये मोठे बदल झाले आहेत.

गेल्या तिमाहीमध्ये प्रत्येक महिन्यात ग्राहक जोडले गेले आहेत. 'बीएसएनएल'च्या ग्राहकसंख्येत ६० लाखांची भर पडली आहे. भारत दूरसंचार निगम लिमिटेडची सेवा गावागावात पोहचवण्यात येत आहे आणि नेटवर्कमध्ये सुधारणा करण्यात येत आहे. सरकारने तोट्यात चालणाऱ्या 'बीएसएनएल'मध्ये सुधारणेसाठी 'फोर जी' आणि 'फाईव्ह जी' सेवांसाठी ८९,०४७ कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केले. गेल्या वर्षी केंद्र सरकारने जून महिन्यात याविषयी मंजुरी दिली होती. बीएसएनएल कर्जात बुडाली होती, तर तंत्रज्ञानातही पिछाडीवर होती. कंपनी गेल्या १२ वर्षांपासून तोट्यात होती; पण सरलेल्या दोन वर्षांमध्ये कंपनीने कात टाकली. आता कंपनी 'फाईव्ह जी' नाही तर 'सिक्स जी'ची तयारी करत आहे. 'बीएसएनएल' सेवेसाठी चाचपणी सुरू असल्याचा दावा करण्यात आला आहे. 'सिक्स जी' तंत्रज्ञानावरही केंद्र सरकारने काम सुरू केले आहे.

आता एक लक्षवेधी बातमी. मोठे शहर असो वा खेडेगाव; स्वस्त धान्य दुकान कोणत्या ना कोणत्या गल्लीत असते. या ठिकाणी सरकारी योजनेत, सरकारच्या किंमतीत, अगदी स्वस्तात साखर, डाळी, गव्हाची आणि तांदळाची खरेदी करता येते. आता हेच काम भारतातील दिग्गज उद्योजक मुकेश अंबानी करतील. त्यांच्या 'रिलायन्स रिटेल'मध्ये ग्राहकांना स्वस्तात धान्य मिळेल. डाळी, तांदळासह इतर अनेक जीवनावश्यक वस्तू अत्यंत स्वस्तात खरेदी करता येतील. स्मार्ट बाजारापासून जिओ स्टोअर, जिओ मार्टसह फॅशनेबल कपडे, खेळणी, ज्वेलरी आदी व्यवसायांमध्ये रिलायन्सने उतम पकड मिळवली आहे. केंद्र सरकार वाढती महागाई कमी करण्यासाठी प्रयत्न करत आहे. त्यासाठी 'रिलायन्स इंडस्ट्रीज'च्या रिटेल नेटवर्कचा वापर करण्यात येणार आहे. महागाई कमी करण्यासाठी सरकार या ठिकाणी जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा करण्याचा विचार करत आहे. रिलायन्स रिटेल आणि भारत सरकारदरम्यान याविषयीच्या चर्चेची पहिली फेरी झाल्याचे समोर येत आहे.

सरकार रिलायन्स रिटेल नेटवर्कच्या माध्यमातून स्वस्त दरात भारत ब्रँडचे पीठ, डाळी, तांदळासह इतर वस्तूंचा पुरवठा करण्याचा विचार करू शकते. प्रत्येक वर्गाला महागाईचे चटके बसत आहेत. या वर्गाला दिलासा देण्यासाठी आणि महागाईची झळ कमी करण्यासाठी केंद्र सरकार रिलायन्ससोबत धान्य आणि इतर वस्तूंचा स्वस्तात पुरवठा करू शकते. गेल्या काही वर्षांमध्ये पीठ, डाळी, गहू आणि तांदळाच्या किंमतीत मोठी वाढ झाली आहे. या किंमती अचानक वधारल्याने केंद्र सरकारने भारत ब्रँड लाँच केला. यामध्ये स्वस्त किंमतीमध्ये पीठ, डाळी आणि तांदळाचा पुरवठा करण्यात येतो. या ब्रँडची सुरूवात केंद्र सरकारने २०२३ मध्ये केली होती. सध्या सरकार नाफेड, 'एनसीसीएफ', केंद्रीय भांडार आणि मोबाईल व्हॅनच्या माध्यमातून या ब्रँडची विक्री करते. या ब्रँड अंतर्गत ग्राहकांना २९ रुपये प्रति किलोने तांदळाचा तर प्रति किलो २७.५० रुपये दराने पीठ, तूर डाळ ६० रुपये किलो दराने विकले जाते

दरम्यान, डिजीटल पेमेंटसंदर्भात महत्वाची माहिती समोर आली आहे. मार्च २०२४ पर्यंत ग्राहकांच्या खर्चात अजूनही रोखीचा वाटा ६० टक्के आहे; परंतु कोविडनंतर हा वाटा झपाट्याने कमी होत आहे. रिझर्व्ह बँकेच्या अभ्यासानुसार तीन वर्षांमध्ये डिजिटल पेमेंटचा वाटा १४-१९ टक्क्यांवरून ४०-४८ टक्क्यांपर्यंत वाढला आहे. रिझर्व्ह बँकेच्या चलन व्यवस्थापन विभागातील प्रा. प्रदीप भुयान यांनी 'भारतासाठी रोख वापर सूचक' शीर्षकाच्या पेपरमध्ये हा निष्कर्ष काढला आहे. डिजिटल पेमेंट प्लॅटफॉर्म, विशेषतः युनिफाइड पेमेंट्स इंटरफेस (यूपीआय) २०१६ मध्ये लाँच करण्यात आले होते. ५०० आणि १,००० रुपयांच्या नोटांच्या विमुद्रीकरणादरम्यान यूपीआयचा वापर मोठ्या प्रमाणात वाढला. या अभ्यासात रोख आणि डिजिटल पद्धतींद्वारे ग्राहकांच्या खर्चाच्या विविध डेटाचे विश्लेषण करण्यात आले आहे. २०१६-१७ मध्ये यूपीआयची सरासरी व्यवहार रक्कम ३८७२ रुपये होती. ती २०२३-२४ मध्ये वाढून १५२५ रुपये झाली. त्याचबरोबर कमी किमतीच्या खरेदीसाठी रोखीचा वापर केला जात आहे. लोकांकडे असलेले चलन ते जीडीपी गुणोत्तर २०२०-२१ मध्ये १३.९ टक्क्यांवर पोहोचले होते. २०२३-२४ मध्ये ते ११.५ टक्क्यांवर घसरले आहे. पी टू एम (व्यक्ती-टू-व्यापारी) व्यवहारांमध्ये यूपीआयचा हिस्सा २०२०-२१ मध्ये ३३ टक्क्यांवरून २०२३-२४ मध्ये ६९ टक्क्यांवर पोहोचला आहे.

आजकाल

# अनीतीने वागा, पण निदान नियम पाळा

श्याम केळकर

शुभ - अशुभ, चांगले - वाईट, सुंदर - कुरूप असे विभाजन अध्यात्मात नसते. अध्यात्म 'जसे आहे तसं' स्वीकारायला शिकविते.

सत्य युगातील नियम आता कलियुगात कसे चालतील? नियम सांगतो - 'नीतीने वागा.' पण तसं वागणं जमत नाही. मग लोक दुसरं टोक गाठतात. म्हणून दादा भगवान म्हणतात - अनीतीने वागलात तरी चालेल पण नियम पूर्वक.

(दादा भगवान यांचे निधन १९८८ साली झाले. १९७७-७८ चे सुमारास तिसरा वेतन आयोग लागू झाला आणि ८७-८८ चे सुमारास चौथा वेतन आयोग लागू झाला. म्हणजे दादाजी बोलले तेव्हा चौथा आयोग निश्चितच लागू नव्हता आणि तिसरा आयोग लागू असेल किंवा नसेल. म्हणजे सरकारी नोकरांचे पगार जास्त नव्हते असा तो काळ आहे.)

असं समजा एक आयकर अधिकारी आहे. त्याची बायको रोज तक्रार करते - 'इतर सर्वांनी लाच घेऊन बंगले बांधले. आणि तुम्ही लाच घेत नाही. तुम्ही तसेच राहिलात. दर महिनाअखेर मला उधार पैसे आणावे लागतात. मुलाची फी सुद्धा भरता येत नाही.'

'त्याला मनात वाटते ₹ ३००-४०० कमी पडतात. मिळाले असते तर बरं झालं असतं. काय करू?'

मी त्याला सांगेन -'लाचं घ्यायची असेल तर ठरव की ₹ ४००/- पेक्षा जास्त लाच घेणार नाही. म्हणजेच तुला कमी पडत आहेत तेवढेच घे. त्यापेक्षा जास्त कधीही घेऊ नकोस. तू अनीतीने वागत आहेस. पण ती नियमात राहून करत जा. हा नियम देखील तुला मोक्षमार्गातच ठेवील.'

नियमात राहून अनीती करणे सोपी गोष्ट नाही. अनीती करताना ती नियमात राहत नाही. ती वाढतच जाते. तसं करू नकोस.

जो नीतीपूर्वक चालतो त्याला अहंकार होण्याची शक्यता खूप जास्त असते. पण नियमात राहून अनीती करणाऱ्याला अहंकार होत नाही. आपण चुकीचे करत आहोत याची बोच त्याला सतत वाटत रहाते. यांची जबाबदारी मी घेतो असं दादा म्हणतात. याचा अर्थ तुमच्यावर कोणतेही कर्मबंधन यामुळे पडणार नाही असा त्याचा अर्थ. तुम्ही पकडले जाणार नाही असा त्याचा अर्थ नाही.)

समजा एखादा चोर आहे. त्याला नोकरी मिळत नाही. व्यवसाय कौशल्य नाही. मी त्याला सांगेन - असं ठरव की महिन्यातून फक्त पाच वेळा चोरी करीन. ६ वेळा कधीही करणार नाही. कधी कमी पैसे मिळतील तर कधी जास्त. पण कमी मिळाले तरी सहाव्या वेळी चोरी करायची नाही. तू अनीतीने वागत आहेसं, पण त्यात नियम ठेव. जबाबदारी माझी. (याचा अर्थ वरील प्रमाणेच )

आमचा जेट्टी बांधण्याचा व्यवसाय होता. आमचा फायदा झाला तरी मी लोकांना सांगत असे. तोटा झाला तरी लोकांना सांगत असे. माझे भागीदार म्हणत - 'तोटा झाला असं कशाला सांगता? अशाने लोक पैसे गुंतवणार नाहीत..' मी म्हणे - 'मग चांगलेच ना! तेवढीच उधारी कमी!'

आमच्या कंपनीला एकदा नुकसान झाले होते. सुमारे ७०-८० हजाराचे नुकसान होते. मधूनमधून मी बडोद्याला गावी जात असे. तेव्हा लोक भेटायला येत. माझ्या कंपनीला तोटा झाला आहे ही बातमी गावी पोचलेली असे. भेटायला येणाऱ्यात दोनही प्रकारचे लोक असत - हितचिंतक आणि हितशत्रू. मला ते ओळखता येई.

हितशत्रू आला तर तो विचारी - ''दादा, तुमचे खूप नुकसान झाले म्हणे! अंदाजे किती? १ लाख? '' मी त्याला सांगे - '' लाखाचे काय घेऊन बसलात, जवळजवळ ३ लाखाचा फटका बसला. '' त्याला मनातून खूप आनंद होत असे. पण तो म्हणे - ''अरेरे, खूप वाईट झाले.'' मी त्याला म्हणे - ''चहा, नाश्ता करून जा.'' तो नको म्हणे. त्याचा तर चहा - नाश्ता झालेलाच असतो ना! आता तो घरी जाऊन मस्त जेवेल -

या उलट हितचिंतक आला तर मी सांगे - ''नुकसान झालं खरं, पण धंदा म्हटले की नफा - तोटा येणारच. झालं ४०-५० हजाराचं नुकसान पण येईल भरून तीन चार महिन्यात - तुमच्या शुभेच्छा असताना कसली चिंता? '' त्यांनाही बरे वाटे. आपण त्यांना का विनाकारण चिंतेत टाकावं?

असं खोटं बोलण्यात कोणाचेच नुकसान नाही. असं खोटं बोलायला हरकत नाही.

काही महिन्यानी तो पहिला माणूस परत येई आणि विचारी - '' काय हालहवाल? तुमचा व्यवसाय अजून चालू आहे की झाला बंद?'' तेव्हा मी सांगे - आहे. अजून चालू आहे. तीन लाख नुकसान झाले होते खरं, पण त्याच्या मागच्या वर्षी ७ लाख फायदा पण झाला होता. त्यामुळे व्यवसाय बंद करायची वेळ काही आली नाही.

इथे आता खोटे बोलून चालणार नाही. त्याला दुःख द्यायचे नाही हे बरोबर आहे पण तो टोचून बोलणार असेल तर सत्य लपवण्यात काहीच अर्थ नाही.त्याला विनाकारण जेवण देण्यात काही अर्थ नाही.

**(दादा भगवान आप्तवाणी -७ मधून सुधारित)**

लोकसंसद

## 'डिजिटल अरेस्ट'पासून सावधान!

एकीकडे देशात वेगाने डिजिटल क्रांती होत असताना सायबर गुन्ह्यातही प्रचंड वेगाने वाढ होत आहे. विशेष म्हणजे सायबर चोर नागरिकांची ऑनलाईन पैसे उकळण्यासाठी नवनवीन क्लुप्त्या शोधून काढत आहेत. त्यासाठी विविध केंद्रीय यंत्रणांचा तसेच राज्यातील सरकारी यंत्रणांच्या नावांचा गैरवापर करुन नागरिकांना धमकावून, घाबरवून कोट्यवधी रुपयांचा गंडा घेतला जात आहे. त्यातच आता 'डिजिटल अरेस्ट' हा सायबर चोरीचा एक नवीन प्रकार उघडकीस आला आहे. 'कोणत्या तरी शासकीय यंत्रणेचा अधिकारी असल्याचे भासवत हे सायबर चोर 'तुमच्या सिम कार्डचा वापर मनी लॉड्रिंगच्या गुन्ह्यात झाला असून लवकरच तुम्हाला अटक होणार आहे' अशी भीती घालतात आणि त्यांच्या बँक खात्यांचा तपशील मिळवून त्यांचे बँक खाते रिकामे करतात अलीकडेच उत्तर प्रदेशातल्या लखनौमधल्या 'पोस्ट ग्रॅज्युएट इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस' मधल्या एका महिला प्राध्यापिकेला 'डिजिटल अरेस्ट' करून तिच्याकडून सायबर गुन्हेगारांनी जवळपास तीन कोटी रुपये उकळल्याची घटना ताजी असतानाच मुंबईतील एका सरकारी रुग्णालयातील वरिष्ठ महिला डॉक्टरला 'डिजिटल अरेस्ट'ची भीती दाखवत सुमारे सात कोटींना फसवल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. अशा प्रकारे 'डिजिटल अरेस्ट'द्वारे होणारी फसवणूक टाळण्यासाठी नागरिकांनी सतत सावध राहिले पाहिजे.

**- प्रदीप मोरे,** अंधेरी

## मराठी साहित्यिक दिनविशेष

**२ नोव्हेंबर**

**१८७१:-** दिवाळी अंकांची परंपरा मराठीत सुरु करणारे 'मासिक मनोरंजन' चे संस्थापक-संपादक काशिनाथ रघुनाथ मित्र यांचा जन्म. विविध भाषांतील साहित्य त्यांनी अनुवादित केले, काही स्वतः लिहिले. 'जागा झालेला बंगाल' हे नाटक तसेच 'प्रियवंदा', 'धाकट्या सूनबाई', 'गरीब विचारी यमुना' या कादंबऱ्या त्यांनी लिहिल्या. **१८८२ :-** जादूकलेला वाहिलेले 'गुरुकिल्ली' हे नियतकालिक सुरु करणारे 'जादूगारांचे जादूगार' डॉ. के. बी. लेले यांचा जन्म. त्यांनी जादूकलेवर काही पुस्तकेही लिहिली होती. **१८८५ :-** संगीत नाटकांचे लेखक, नट आणि दिग्दर्शक अण्णासाहेब किर्लोस्कर यांचे निधन. 'विक्रमचरित्र', 'एल्फिन्स्टन बाजीराव फार्स', 'शांकरदिग्विजय' ही त्यांची आणखी काही नाटके. दक्षिणा प्राईस कमिटीच्या स्पर्धेसाठी त्यांनी शिवाजी महाराजांवर ५०० आर्यांचे एक दीर्घकाव्य रचले. याखेरीज 'किरातार्जुनीय', 'समुद्रमंथन', 'श्रीकृष्णपारिजातक', 'हरिश्चंद्र' मिळून ३८ आख्याने व नाट्यकाने रचली. 'अल्लाउद्दिनाची चितूरगडावर स्वारी' हे गद्य नाटकही त्यांनी लिहिले. मात्र ज्या त्यांच्या नाटकांनी मराठी रंगभुमीचा चेहरामोहरा बदलून रंगभूमीवर क्रांती केली. अशी अण्णासाहेबांची संगीत नाटके फक्त तीन १) संगीत शांकुतल २) संगीत सौभद्र ३) रामराज्यवियोग. त्यापैकी 'संगीत सौभद्र' हे त्यांचे आजही रसिकप्रिय असलेले नाटक होय. **१९०८ :** अध्यापन लेखक शंकर दिगंबर काळे यांचा जन्म. ह्यांचे 'मुलभुत इंग्रजी वाक्यरचनेचा नवा मार्गदीप' हे पुस्तक इंग्रजी व मराठी भाषांचा अध्ययनाच्या व अध्यापनाच्या दृष्टीकोनातून तौलनिक अभ्यास दर्शवणारे आहे. 'लयताल विचार' ह्या ग्रंथासह 'नवशक्ती', 'अभिरुची', 'शब्द-श्री', 'सत्यकथा' इ. मध्ये लेख आणि 'सृष्टीज्ञान' मासिकातून विज्ञानविषयक लेख लिहिलेत. **१९१४:** लेखक शरदश्चंद्र विष्णू गोखले यांचा जन्म. **१९२८ :** कवयित्री कुसूम कमलाकर पटवर्धन यांचा जन्म. आकाशवाणीवरुन ह्यांचे मराठी सुगम संगीताचे कार्यक्रम प्रसारित. ह्यांचे 'सृजन', 'निर्मिती', 'कृष्णार्पण' हे काव्यसंग्रह प्रसिध्द आहेत. **१९४१ :** नाट्यलेखक, नाट्यदग्दर्शक, नाट्यअभिनेते, नाट्यसमीक्षक सुभाष भालचंद्र देशपांडे यांचा जन्म. 'अंधारातून उजेडाकडे आणि इतर' एकांकिका असा तीन एकांकिकांचा संग्रह त्यांच्या नावावर आढळतो. **१९४६ :** भयकथा, गूढकथा तसेच नियतकालिकांतून विविध विषयांवर लेखन करणाऱ्या जयश्री रमेश कुलकर्णी यांचा जन्म. ह्यांच्या 'अकबराची अंगठी', 'काळी छाया', 'चाळीस लाखांचा धनी', 'चित्याला आव्हान', 'चंद्रपुरच्या जंगलात', 'परागंदा', 'पळालेला कैदी', 'हिरवा लांडगा' आदी रहस्यकथा प्रकाशित झाला आहे. **१९५० :-** अशोक निलकंठ सोनवणे यांचा जन्म. 'नील - अंश', 'माय आणि इतर कविता', 'रुप अरुपाचे' ह्या प्रौढकाव्यासह 'बंडू जातो त्यांच्या वंशा', 'बंडू नाटक करतो', 'रविवारच्या शोधात बंडू' ही बालनाट्ये तसेच 'गाव गुणाचा' ही कथा; 'बहिणाबाई गाणी गाई' हे बालचरित्र, 'सोन्याचा वाटा' ह्या कथा, प्रौढ शिक्षणासाठी आणि 'रंग पंखांचे वाहून गेले' हे बालकाव्य व सुलभ निबंध इत्यादी साहित्य प्रसिध्द. **१९५४ :** ग्रीक साहित्य व तत्त्वज्ञानाचे अभ्यासक गोपाळ विष्णू तुळपुळे यांचे निधन. 'ग्रीक पौरोणिक कथा', 'निवडक ग्रीक कथा', 'सॉक्रेटिस : चरित्र व तत्त्वज्ञान', 'ग्रीक तत्त्वज्ञानाचा इतिहास' याशिवाय हरिभाऊंच्या 'मी' कादंबरीचे रसग्रहण करणारे पुस्तक तसेच 'मताविकास' हे मासिक त्यांनी सुरु केले. **१९८४ :** कवी, कादंबरीकार, समीक्षक आणि कलात्मतेला अंतर न देता सामाजिक/ राजकीय व्यवस्थेवर टीका करणारे शरच्चंद्र माधव मुक्तिबोध यांचा मृत्यू. 'नवी मळवाट', 'यात्रिक' आणि 'सत्याची जात' हे काव्यसंग्रह; 'क्षिप्रा', 'सरहद्द' आणि 'जन हे वोळतु जेथे' हे कादंबरीत्रय, तसेच 'जीवन आणि साहित्य', 'सौंदर्य आणि साहित्यमूल्य', 'काही निबंध' ही ललितेतर पुस्तके त्यांनी लिहिली.

**- संजय वझरेकर**
**९९७५५७६६७५**

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२ नोव्हेंबर

१) श्रीम. अनद्या ज्योतिपप्रकाश मुकादम इस्त्रायल आळी, अलिबाग, २-११-१९५०

२) श्रीम.अजनी अर्जुन मिसाळ काळोशी, अलिबाग, २-११-१९५४

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे. **संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**


## १९४-महाड विधानसभा मतदारसंघावर दृष्टिक्षेप

# नवमतदारांवर उमेदवारांच्या विजयाची भिस्त

**। पोलादपूर। शैलेश पालकर ।**

**पोलादपूर तालुक्यामध्ये लोकसभा निवडणुक काळात अंगणवाडी सेविका आणि आशासेविका या बहिणींना निवडणूक काळातील भत्ता आणि भोजन देण्याची तरतूद नसल्याने त्यांचे अतोनात हाल झाले होते म्हणून विधानसभा निवडणूक काळात या बहिणींचा समावेश करण्यात आला नसल्याचे दिसून येत आहे.**

२००९ साली पुनर्रचनेनंतर अस्तित्वात आलेल्या महाड विधानसभा मतदार संघामध्ये माणगाव तालुक्यातील काही गावांचा समावेश झाला आणि त्यानंतर निर्णायक मतदार पोलादपूर तालुक्यातील की माणगांव तालुक्यातील अशी चुरशीची परिस्थिती निर्माण झाली. मात्र, या पुनर्रचनेनंतर पोलादपूर तालुक्यातील मतदारांचे निर्णायक वर्चस्व कमी होऊन माणगाव तालुक्यातील वाढलेल्या मतदारांवर उमेदवारांच्या विजयाची भिस्त असल्याचे चित्र मागील तीन विधानसभा निवडणुकांमध्ये दिसून आले. दरम्यान, या १९४-महाड मतदार संघातील विधानसभा निवडणूक २०२४ची कागदोपत्री सुसज्जता प्रशासनामार्फत करण्यात आली असली तरी दुसरी यंत्रणा राजकीय पक्षांचे आणि उमेदवारांचे कार्यकर्ते राबवित असतात.




माणगाव, महाड व पोलादपूर या तीन तालुक्यातील ३४३ ठिकाणी एकूण ३९३ मतदान केंद्र असून यात शहरी ३० तर ग्रामीण भागात ३६३ मतदान केंद्रांचा समावेश आहे. यापैकी मोबाईलफोनद्वारे संपर्कक्षेत्रात असलेली मतदान केंद्र ३७५ असून मोबाईल आणि लॅण्डलाईन अशा दोन्ही प्रकारे संपर्कात असलेल्या मतदान केंद्राची संख्या १८ आहे.

पोलादपूर तालुक्यात ६ आणि महाड तालुक्यातील ७ यामध्ये मतदार संख्या २ लाख ९२ हजार ७८४ आहे. यातील पीडब्ल्यूडी व्होटर्सची संख्या माणगांवमध्ये ६५० महाडमध्ये ११७० आणि पोलादपूरमध्ये ४८३ अशी एकूण विधानसभा मतदार संघात २३०३ आहे. ८५ वर्षांपेक्षा अधिक वयोमान असलेल्या मतदारांची विधानसभा मतदार संघातील संख्या ६ हजार ८९४ आहे. देशसेवेतील मतदार ४५७ आहे. आखाती देशातील मतदार ४ आहेत.

महाड विधानसभा मतदार संघात ३ तालुक्यातील माणगावमधील २९ ग्रामपंचायती, महाडमधील १३४ ग्रामपंचायती तर पोलादपूर तालुक्यातील ४२ ग्रामपंचायतींचा अशा एकूण २०५ ग्रामपंचायतींचा समावेश आहे. महाड आणि पोलादपूर अशा नगरविकास खात्यांतर्गत नगरांचा समावेश आहे. ३ तहसिल कार्यालयापैकी ४०४ महसूली गावांचा समावेश आहे. माणगाव ४ महाड ९ आणि पोलादपूर ३ अशा एकूण १६ मंडल कार्यालयांचा समावेश आहे. माणगांव तालुक्यातील १५५, महाड तालुक्यातील २७२ तर पोलादपूर तालुक्यातील १०३ असा एकूण ५३० प्राथमिक शाळांचा समावेश आहे. ७ उच्च माध्यमिक कॉलेज, ५ वरिष्ठ महाविद्यालये तर महाड तालुक्यात एकूण वीर, विन्हेरे, करंजाडी व वामनेसापे अशी ४ रेल्वे स्थानकं आहेत.

२०२४ मधील प्रस्तावित लोकसंख्या माणगाव तालुक्यात ५४ हजार ३५४ पुरूष आणि ५२ हजार ९९७ महिला अशी १ लाख ७ हजार ३५० आहे. महाड तालुक्यात १ लाख २५५० पुरूष आणि १ लाख १५९ महिला अशी एकूण लोकसंख्या २ लाख २७०९ आहे. पोलादपूर तालुक्यात ३२ हजार २२७ पुरूष आणि ३१ हजार ४२३ अशी एकूण ६३ हजार ६५० लोकसंख्या आहे. म्हणजेच महाड विधानसभा मतदार संघात १ लाख ८९ हजार १३०पुरूष आणि १ लाख ८४ हजार ५८४ अशी एकूण ३ लाख ७३ हजार ७०९ लोकसंख्या आहे. यापैकी माणगाव तालुक्यात ४४ हजार ७१० पुरूष आणि ४४ हजार ७५० महिला अशी ८९ हजार ४६० मतदारसंख्या आहे. महाड तालुक्यात ७९ हजार ४१८ पुरूष आणि ८० हजार २१३ महिला अशी १ लाख ५९ हजार ६३१ मतदारसंख्या आहे. पोलादपूर तालुक्यात २१ हजार ५६२ पुरूष आणि २१ हजार १३१ महिला अशी एकूण ४३ हजार ६९३ मतदार संख्या आहे. म्हणजेच महाड विधानसभा मतदार संघात १ लाख ४५ हजार ६९० पुरूष आणि १ लाख ४७ हजार ९४ अशी एकूण २ लाख ९२ हजार ७८४ मतदार संख्या आहे.

महाड तालुक्यात २१३, माणगाव तालुक्यात ११३ आणि पोलादपूर तालुक्यात ६७ अशी एकूण मतदान ३९३ केंद्र असून ३९३ मतदान केंद्र निहाय अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात येणार आहे. यामध्ये माणगांवमधील ९७ शिक्षक, २ ग्रा.पं.कर्मचारी, ३१ अंगणवाडी सेविका, कृषीसहायक १ आणि २ तलाठी असे ११३ कर्मचारी महाडमधील १०५ शिक्षक, ६५ ग्रा. पं.कर्मचारी, १० अंगणवाडी सेविका, कृषीसहायक ९ आणि २४ तलाठी असे २१३ कर्मचारी तर पोलादपूरमधील ३३ शिक्षक, १८ ग्रा.पं.कर्मचारी, कृषीसहायक ८ आणि ८ तलाठी असे ६५ कर्मचारी तर संपूर्ण महाड विधानसभा मतदार संघामध्ये २१५ शिक्षक, ८५ ग्रा. पं.कर्मचारी, ४१ अंगणवाडी सेविका, कृषीसहायक १८ आणि ३४ तलाठी असे ३९३ कर्मचारी नियुक्त करण्यात येणार आहेत. नोडल ऑफिसर टिम १५, सेक्टर ऑफिसर्स ६१, सेक्टर पोलीस ऑफिसर्स ६१, फ्लाईंग सर्व्हेलन्स टिम ९ पथकांत ३० कर्मचारी, स्टॅटीक सर्व्हे लन्स टिम ९ पथकांत ३० कर्मचारी, व्हिडीओ सर्व्हेलन्स टिम ९ पथकांत ४१ कर्मचारी, व्हिडीओ व्हिवींग टिम १ पथकांत ३ कर्मचारी आणि अकाऊंटींग टिम १ पथकांत १४ कर्मचारी, अशा प्रशिक्षित करण्यात आले असून आवश्यक मनुष्यबळ १९६५ आणि २७१८ डाटा एन्ट्री स्टाफ असे आहे.

# इसांबे येथील वळण धोकादायक

■ **कारखान्यातील माती रस्त्यावर**

■ **धुळीमुळे अपघाताचा धोका**

**। पाताळगंगा । वार्ताहर ।**

सावरोली खारपाडा या रस्त्यांचे काम काही वर्षांपूर्वी झाल्याने वाहनचालकांच्या शारीरिक व्याधी कमी झाली आहे. मात्र, इसांबे या मार्गावर रस्त्यालगत निर्माण होत असलेले कारखाने मात्र या रस्त्याला केराची टोपली दाखवत आहे. या कारखान्याला भरावासाठी अथवा माती वाहून नेण्यासाठी अवजड वाहनांचा वापर केला जात आहे. यामुळे वाजवीपेक्षा जास्त माती यामध्ये लोड केल्यामुळे या ठिकाणी पडलेली पहावयास मिळत आहे.

नोव्हेंबर महिना हिटचा असल्यामुळे या मातीचे धुळीत रुपांतर होऊन रस्ता अपघाताला कारणीभूत ठरत आहे. दरम्यान, माजगाव येथील वसंत पाटील या व्यक्तीचा अपघात झाल्यामुळे नागरिक संतप्त भावना व्यक्त करीत आहेत.




इसांबे गावानजीक कारखाना निर्माण होत असून, मागील वर्षापासून त्याचे काम सुरु आहे. मात्र, येथील स्थानिक कोणत्याही प्रकारची भूमिका घेत नसल्यामुळे सर्व नियम धाब्यावर बसवून या ठिकाणी काम सुरु आहे. रस्त्यावर वाहनातून पडलेली माती पाणी मारुन साफ करण्याचे सहकार्य करीत नसल्यामुळे गुरुवारी वसंत पाटील यांचा या ठिकाणी अपघात झाला. तसेच दोन महिन्यांपूर्वी कोपरी येथील युवकाचा अपघात झाला. असे अनेक अपघात या ठिकाणी सातत्याने घडत असल्यामुळे व्यवस्थापक याकडे साफ दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप येथील वाहनचालक करीत आहेत.

या रस्त्यालगत येत असलेले कारखाने स्थानिकांना जरी नोकरी मिळणार असले तरीसुद्धा या मार्गावर प्रवास करणारे यांची सुरक्षा महत्त्वाची आहे. मात्र, व्यवस्थापक याकडे साफ दुर्लक्ष करीत आहे. परिणामी, हा रस्ता प्रवासीवर्गासाठी धोकादायक बनला आहे. मात्र, या रस्त्यावर असाच प्रकार सातत्याने घडत राहिले तर परिणामी आम्हाला आंदोलनाचे हत्यार उपसावे लागेल, अशी प्रतिक्रिया या मार्गावरुन नित्यनेमाने प्रवास करणारे प्रवासी व्यक्त करीत आहेत.

## PUBLIC NOTICE

NOTICE is hereby given that our client has agreed to purchase/acquire from **1. NISHAD A. SAMAD MODI, 2. SONABIBI ABDUL KARIM MODI, 3. KHAIRUNISSA BUNIYAD ULDE, 4. ZEBA KASHAF MODI, 5. DANISH MANSOOR SAYYED, 6. SUHEL ABDUL KARIM MODI, 7. NABEEL ABDUL KARIM MODI & 8. BATUL SALMAN CHOUGLE** the under mentioned property, free from any encumbrance, charge, lien, claim, right or any other interest of whatsoever nature of any one over the same.

If any persons or institutions claim to have any charge, encumbrance, right, interest or entitlement of whatsoever nature over the said property or any part thereof, they should make known the same in writing with evidences thereof to the undersigned at their office At- Bazarpeth Murud, Post & Tal. Murud, Dist. Raigad 402401 and also email to kunaljain.512@gmail.com, within **10 days** from the date of publication of this notice, failing which the transaction shall be completed without reference to any such claim, right, interest, charge, encumbrance or any other right or entitlement of whatever nature of any one.

**DESCRIPTION OF THE PROPERTY**

All that piece or parcel of the land bearing Gat No.82, Hissa No.4, Total Area Admeasuring 0-22-50 (H.A) with Pot Kharaba 0-02-00, Assessed at Rs.Ps- 0-26 Being agricultural land lying and being at revenue Village- More, Taluka- Murud, District- Raigad.

**Date: 02/11/2024**

Sd/-
**Adv. Kunal Lalit Jain**
**Advocate**

## महिलेचे मंगळसूत्र लांबविले

**। रसायनी, । वार्ताहर ।**

पनवेल एसटी बस स्टँडमधील बसमध्ये चढत असताना ६० वर्षीय महिलेच्या गळ्यातील मंगळसूत्र चोरल्याप्रकरणी चोराविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. पुष्पा धनावत या रसायनीतील वाशिवली येथे राहात असून, त्या व त्यांचे पती चष्मा दुरुस्त करण्यासाठी रसायनी येथून एसटी बसने पनवेल येथे आल्या. ओरियन मॉल येथे चष्म्याचे काम करून दोघे रसायनीला जाण्यासाठी दुपारी एसटी स्टँडवर आल्या आणि वाशीवली येथे जाणाऱ्या बसमध्ये चढले. बसमध्ये चढत असताना प्रवाशांची गर्दी होती.

बसमध्ये बसल्यानंतर त्यांना फोन आल्याने फोन उचलत असताना फोनच्या स्क्रीनमध्ये चेहरा दिसला. यावेळी गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र नसल्याचे दिसून आले. त्यांनी आजूबाजूला मंगळसूत्राचा शोध घेतला. अज्ञात चोरट्याने गर्दीचा फायदा घेऊन त्यांच्या गळ्यातील सोन्याची वाटी असलेले सोन्याचे मंगळसूत्र चोरून नेले. बसस्थानकात एसटीमध्ये चढताना अनेक महिलांच्या दागिने यापूर्वीदेखील चोरीला गेलेले आहेत. त्यामुळे पोलिसांनी या ठिकाणी गस्त वाढविण्याची मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# चार अनोळखी महिलांचा सराफी दुकानावर डाका

■ **३० हजार रुपयांचा ऐवज लंपास**

**। म्हसळा, । वार्ताहर ।**

म्हसळा पोलीस ठाण्यापासून ७० मीटरच्या अंतरावर जुन्या सराफी दुकानावर ४ फिरस्त्या महिलांनी काही वस्तू घेण्याच्या बहाण्याने प्रवेश केला आणि ६० वर्षांच्या आजीची फसवणूक करून सुमारे ३० हजार किमतीची मुद्दे मालाची पेटीच गायब केल्याची घटना बुधवारी (दि.३०) भरदुपारी दोनच्या सुमारास घडली.

याबाबत सराफी दुकानाच्या मालक सुषमा सुरेश वेदक (६०) रा. म्हसळा सोनार आळी यांनी दिलेल्या फिर्यादीवरून म्हसळा पोलिसांनी गुन्ह्याची नोंद केली आहे. फिर्यादीने सांगितलेल्या वर्णनानुसार यामध्ये सुमारे ४५ वर्षांच्या महिलेने साडी परिधान केली होती, तर ३० वर्षांच्या दोन आणि १० वर्षांच्या एका अल्पवयीन मुलीने ड्रेस परिधान केला होता. या चारही महिला सावळ्या रंगाच्या असल्याचे सुषमा आजीने सांगितले. १०-१२ वस्तू असलेल्या वस्तू सोडून अन्य वस्तूंची संबंधित महिलांनी मागणी केली असता सुषमा आजीने पेटी तिथेच सोडून अन्य वस्तूच्या शोधात घरात गेल्या असता या चार महिलांनी पेटीवर डाका मारल्याचे सांगितले.





## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या नोटीसीने असे कळविण्यात येते की, माझ्या अशिलांनी मौजे भाल, ता.अलिबाग, जि. रायगड येथील श्रीमती. वनिता महादेव दळवी, वगैरे रा.भाल यांच्या सामाईक मालकीची खालील वर्णनाची जमीन मिळकत खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

मौजे भाल, ता.अलिबाग, जि. रायगड येथील भूमापन क्रमांक व उपविभाग ६५/१/ब, क्षेत्र ०-४०-५० हे. आर, पो.ख. ०-०५-३० हे. आर एकूण क्षेत्र ०-४५-८० हे. आर.. आकार रु.१०.१२ पैसे.

तरी वर वर्णन केलेली मिळकत विद्यमान मालकांचे ताबे कब्जा वहिवाटीत, निर्वेध, बोजा विरहित विकण्यायोग्य असल्याची हमी विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिली आहे. तरी वरील मिळकतीसंदर्भात कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क हित संबंध असल्यास अथवा त्यांची या व्यवहारास हरकत असल्यास आपली हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासहित ही नोटीस प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून १४ दिवसांचे आत माझेकडे लेखी पुराव्यानिशी देऊन माझी खात्री पटवून द्यावी. विहित मुदतीत अशी कोणतीही हरकत न आल्यास माझे अशील त्यांचा संदर्भित मिळकतींचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण :- अलिबाग
दिनांक :- ०१/११/२०२४

सही /-
**अ‍ॅड. ऋग्वेद अविनाश ठाकूर.**
रा. ५/३, आत्माराम नगर,
अलिबाग- रायगड
मोबा. नं. ९८५००९०१०३

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

# पदाचा उपयोग लोकहितासाठी करणार : सुरेश मगर

**। कोलाड । वार्ताहर ।**

समाजकारण व राजकारणात पुढे जात असताना आपल्या भागातील, परिसरातील, घरातील लोकांची ताकद महत्त्वाची आहे. तुमची ताकद माझ्या पाठीशी असल्याने मला चांगली संधी सातत्याने राजकारणात व समाजकारणात मिळत आहे. तुमची प्रेरणा व ताकद घेत माझ्या पदाचा फायदा लोकांसाठी करणार आहे. शामराव पेजे महामंडळावर काम करत असताना रायगड जिल्ह्यातील सुशिक्षित तरुण व महिलांसाठी या महामंडळातून फायदा मिळवण्यासाठी प्रयत्न करणार आहे. मी काम करत असताना माझे लोक व विरोधक असा कधीही भेदभाव करत नसल्याचे सुरेश मगर यांनी सांगितले.



ओबीसी जनमोर्चा रायगड जिल्हाध्यक्ष सुरेश मगर यांची महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ अंतर्गत शामराव पेजे कोकण व इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळाच्या अशासकीय संचालक मंडळावर निवड झाल्यावर शिवसमर्थनगर महादेववाडी यांच्यावतीने आयोजित सत्कार कार्यक्रमप्रसंगी सुरेश मगर बोलत होते. यावेळी ओबीसी जनमोर्चा रोहा तालुका सरचिटणीस महादेव सरसंबे, अनंत मगर, कोळी समाज नेते नवनीत डोलकर, उपसरपंच अरविंद मगर, ग्रामपंचायत सदस्य सचिन सुतार व असंख्य नागरिक उपस्थित होते.

## कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
(भारत सरकारचा उपक्रम)

सादर सेवा

**खुली ई-निविदा मागविणारी सूचना दिनांक 30.10.2024**

कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लि. च्या वतीने, वरिष्ठ विभागीय अभियंता, रत्नागिरीद्वारा खालील कामासाठी खुली ई-निविदा आमंत्रित करण्यात येत आहे. **कामाचे नाव:** रत्नागिरी आणि कारवार विभागातील FOBs व ROBsचे स्ट्रक्चरल ऑडिट करणे. **निविदा क्रमांक: केआर-आरएन-डब्ल्यू-2024-76. अंदाजे खर्च:** ₹ 13,95,534/- **ईएमडी:** ₹ 27,900/- **ऑनलाईन निविदा जमा करण्याची अंतिम तारीख आणि वेळ: 21.11.2024, 15.00 वाजेपर्यंत.** अधिक माहितीसाठी प्रादेशिक रेल्वे व्यवस्थापक कार्यालय, एमआयडीसी परिसर, मिरजोळे, रत्नागिरी येथे संपर्क साधावा. **(वेबसाईट: https://www.ireps.gov.in)**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. अनंत लक्ष्मण सावंत यांजकडून कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. तशी बोलणी आमचे अशिल व विद्यमान मालक यांच्यात झालेली आहे. सदर मिळकतीच्या मालकी हक्काबाबत शोध घेण्याकरीता व त्या मिळकतीच्या विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करण्याकामी जाहिर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमच्याकडे दिले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र हे.आर. (आर.चौ.मी) | आकार (रू.पै.) | विद्यमान मालक |
|---|---|---|---|---|
| तलवडे अलिबाग | १८१ | क्षेत्र ०-४१-४०<br>पो.ख. ०-००-००<br>एकूण क्षेत्र ०-४१-४० | ४.०३ | श्री. अनंत लक्ष्मण सावंत |

सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. या उपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी स्वरूपात खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे मुदतीत सादर कराव्यात.

येणेप्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न असल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीचा विक्री व्यवहार पुर्ण करतील व मागाहुन येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

कळावे,

अलिबाग,
तारीख : ०१/११/२०२४

**(अ‍ॅड. सागर विजय पाटील)**
पत्ता : मु. घर नं. १६०६, लालबाग,
ब्राम्हण आळी, ता. अलिबाग,
जि. रायगड. मो. नं. ९९२२५६७८९१

# ड्रम सीडर शेतकऱ्यांना फायदेशीर : काशिद

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली तसेच महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणेच्या कार्यकारी परिषदेचे सदस्य विनायक काशिद यांनी निलिकेश बाळासाहेब दळवी यांच्या अभियांत्रिकी कर्मशाळेत भेट दिली. त्यांनी बनविलेल्या विविध यंत्रांची पाहणी केल्यावर सुधारित ड्रम सीडर भात उत्पादक शेतकऱ्यांसाठी फायदेशीर असल्याचे मत व्यक्त केले.



भातशेती परवडण्यासाठी मजुरांवर होणारा खर्च कमी करणे आवश्यक असल्याने यांत्रिकीकरणाची कास धरणे महत्त्वाचे आहे, हे हेरून स्व. बाळासाहेब दळवी यांनी सुधारित ड्रम सीडर यंत्र बनविले होते. त्यांची दोन्ही मुले निलिकेश आणि नयनिश यांना अभियांत्रिकी क्षेत्रात विशेष आवड असल्याने ते वेगवेगळे प्रयोग करीत असतात. हैद्राबादच्या भात संशोधन संचालनालयाने बनविलेल्या ड्रम सीडरमध्ये नावीन्यपूर्ण बदल करून त्यांनी सुधारित ड्रम सीडर बनविला आहे. या यंत्राने ओल्या तसेच सुक्या वाफ्यावरही भात बियाणांची पेरणी करता येते. पेरणी केल्यानंतर चौथ्या-पाचव्या दिवशी 'साथी' हे तणनाशक युरियामध्ये मिसळून फोकून दिल्यास फक्त तण मरते, मूळ पिकास धोका होत नाही. ही पद्धती अवलंबविल्यास लावणी करण्याची गरज राहात नाही. त्यामुळे हेक्टरी २३ मजुरांची बचत होते, असे निलिकेश दळवी यांनी सांगितले.

या यंत्राबद्दल काशिद हे खूप प्रभावित झाले. त्यांनी दळवी यांचे अभिनंदन केले आणि कृषी विद्यापीठाकडून शक्य ती सर्व मदत करण्याचे अभिवचन दिले. यावेळी त्यांना पावर ट्रिलरचलित भात कापणी यंत्र आणि कंबाईंड हार्वेस्टरचीही माहिती देण्यात आली. अन्य प्रगतशील शेतकरी विनय वेखंडे आणि कैलास दळवी यांनी त्यांना भात बीजोत्पादन संस्थेची माहिती दिली. यानिमित्ताने निलिकेश दळवी यांनी काशिद यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला.

## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



**मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.**

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

# मोबाईल वापराबाबत जनजागृती

## फलकातून संदेश पोहोचविण्याचा पोयनाड पोलिसांचा प्रयत्न

**। अलिबाग । प्रमोद जाधव।**

**मोबाईलच्या अतिवापरामुळे लहान मुलांना मानसिक आजार उद्‌भवण्याचा धोका निर्माण झाला आहे. पोयनाड पोलिसांनी मोबाईल वापराबाबत जनजागृती केली आहे. पोलीस ठाण्याच्या आवारात फलक लावून संदेश पोहोचविण्याचा प्रयत्न केला आहे.**




आधुनिक युगात तंत्रज्ञानाचा वापर प्रचंड वाढला आहे. ऑनलाईन शिक्षणापासून वेगवेगळ्या वस्तू ऑनलाईन खरेदीवर भर दिला जात आहे. मोबाईलवरील सोशल मिडीयाचा वापरदेखील वाढला आहे. वेगवेगळ्या रिल्स तयार करण्याचा क्रेझही वाढू लागला आहे. पूर्वी लहान मुलांना काही वेळापुरताच मोबाईल वापरण्यास दिला जात होता. परंतु गेल्या काही वर्षापासून लहानमुले मोबाईल स्क्रीनच्या अगदी जवळ गेली आहेत. सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत मोबाईलचा वापर लहान मुले करीत आहेत. फ्रि फायर सारख्या असंख्य ऑनलाईन गेमचे आकर्षण मुलांना झाले आहे.

लहानमुले रडत असल्यास त्यांना मोबाईल देऊन गप्प करणे, जेवताना मोबाईल देणे हा फॅड प्रचंड वाढला आहे. रुग्णालयात उपचारासाठी नेले तरीदेखील त्याला मोबाईल देऊन शांत करणे हा प्रकार वाढला आहे.त्यामुळे लहान मुले मोबाईलच्या आहारी जाऊ लागले आहेत. मोबाईच्या अतिरेक वापराचा आरोग्यावर ही परिणाम होण्याची चिंता तज्ञांनी व्यक्त केली आहे.

मोबाईलच्या वापराचा मुलांच्या मनावर होणार परिणाम होण्याची भिती निर्माण झाली आहे. मोबाईलमध्ये मग्न असलेल्या मुलांचा संवाद कमी झाला आहे. प्रत्यक्ष माणसांशी ते दुर होत असल्याचे चित्र आहे. मुलांमध्ये चिडचिडपणा, एकलकोंडेपणा निर्माण होणे, सतत मोबाईल वापरामुळे त्यांच्या डोळ्यावर परिणाम होणे असे परिणाम जाणवत असल्याचे तज्ञांचे मत आहे. मोबाईलचा वापर प्रचंड वाढला आहे. लहान मुलांना पालकांकडून वेगवेगळ्या कारणासाठी मोबाईल दिला जातो. वेगवेगळ्या चुकीच्या सोशल मिडीयाच्या वापरामुळे सायबर व अन्य ऑनलाईन गुन्हेगारीत मुले अडकण्याची शक्यता नाकारता येत नाही.

> मोबाईलच्या अतिरेक वापरमुळे शारिरीक व मानसिक त्रास मुलांना होण्याची भिती आहे. मुलांमध्ये एकलकोंडेपणा, चिडणे, हट्टीपणा निर्माण होण्याची शक्यता आहे. मुले मोबाईलवरील सोशल मिडीयावर सतत ॲक्टीव राहत असल्याने त्यांचे मैदानी खेळावरील आकर्षण कमी झाले आहे. मोबाईलमधील खेळांवर मुले अधिक भर देत आहेत. त्यामुळे पालकांनीदेखील याकडे गांभीर्याने लक्ष देणे आवश्यक आहे.
>
> - डॉ. शितल जोशी
> अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक, रायगड

> तंत्रज्ञानाच्या युगात मोबाईल ही काळाची गरज आहे. मोबाईलवरील वेगवेगळ्या ऑनलाईन गेम्सच्या आहारी मुले जाण्याची भिती आहे. त्यांच्या वागण्यावरही परिणाम होण्याची शक्यता आहे. सायबर व इतर गुन्ह्यात मुले अडकू नये यासाठी वरिष्ठ पातळीवर जनजागृतीपर उपक्रम हाती घेतला आहे.
>
> - संतोष दराडे,
> सहाय्यक पोलीस निरीक्षक, पोयनाड

त्यामुळे रायगड पोलिसांनी मोबाईलच्या वापराबात जनजागृती सुरु केली आहे. पोयनाड पोलीस ठाण्याच्या आवारात मोबाईल काळाची गरज, बाळाची नाही हा संदेश देत मुलांना मोबाईलच्या जास्त आहारी घालवू नका याबाबत त्यांनी फलक लावून जनजागृती करण्याचा प्रयत्न केला आहे.



# संस्कृतीमधून बाल संस्काराचे धडे

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

मोबाईलमध्ये रमणाऱ्या पिढीला योगसाधना, पारायणाचे महत्व पटवून देण्यासाठी मुशेमध्ये सांस्कृतिक केंद्र उभारण्यात आले आहे. गेल्या पाच वर्षापासून या केंद्राच्या माध्यमातून हजारो बालकांना संस्काराचे धडे देण्यात आले असून गडकिल्ले याची माहिती पोहचविण्याचे काम संस्कृतीच्या माध्यमातून संपदा पोंगडे व त्यांचे सहकारी करीत आहेत.

संस्कृती केंद्र हे गेल्या चार ते पाच वर्षापासून मुशेत गावामध्ये चालू आहे. संस्कृती केंद्रामध्ये अथर्वशीर्ष, भवानी अष्टक पंधरावा अध्याय आणि अनेक मंत्र मुलांना शिकवले जातात. योग साधना, मेडिटेशन अशी अनेक अष्टके शिकविली जातात. मुलांना गड किल्ल्यांवर नेऊन तेथील इतिहास व पावित्र्य राखण्याबाबत माहिती दिली जाते. त्याठिकाणी स्वच्छता करून श्लोक घेतले जातात. मुलांना समुद्रावर नेऊन वाळूमध्ये शिवाजी महाराजांच्या काळातील किल्ले बांधण्याच्या स्पर्धा घेतल्या जातात. नदी, ओढा, धबधबा अशा ठिकाणी जाऊन त्याठिकाणीदेखील स्वच्छता मोहीम राबवून योगाचे धडे मुलांना दिले जातात. मैदानी खेळ किंवा बौद्धिक खेळ मंत्र हे केल्याने मुलांचा रोजचा अभ्यास सुद्धा खूप सुरळीत पडण्यास मदत होत आहे. मोबाईलमध्ये रमणाऱ्या मुलांमध्ये योग, मंत्राच्या माध्यमातून बौध्दीक शक्तीमध्ये वाढ करण्याचा प्रयत्न केला आहे.

# राज्यस्तरीय शालेय हँडबॉल स्पर्धेसाठी निवड

## ■ न्यू होरायझन पब्लिक स्कूलमधील खेळाडूंची कामगिरी

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

पनवेलमधील न्यू होरायझन पब्लिक स्कूलने मुंबई विभागीय शालेय हँडबॉल स्पर्धेत सलग तिसऱ्या वर्षी विजय मिळविला. ऐतिहासिक हॅट्ट्रिक साधत राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली.

स्पर्धेच्या अंतिम सामन्यात न्यू होरायझनच्या खेळाडूंनी उत्कृष्ट खेळाची कामगिरी करत यशोधाम स्कूल गोरेगाव मुंबई या संघावर १०- ०४ अशी मात केली. खेळाडूंची खेळातील उत्कृष्ट तांत्रिक कौशल्ये, मजबूत संघभावना, आणि प्रशिक्षकांनी दिलेली रणनीतीच्या सखोल तयारीमुळे स्पर्धेत त्यांचा दबदबा निर्माण झाला होता.



न्यू होरायझनच्या संघातील खेळाडू अभिनव काटकर, ओमकार माकू, अंकित कोतकर, स्मिथ सकपाळ यांच्या आक्रमक आणि रुद्र सोनवणे व श्लोक साळुंखे यांचे गोल रक्षण या दोन्ही प्रकारच्या कौशल्याने आपले वर्चस्व सिद्ध केले. मुख्य प्रशिक्षक प्रशांत महल्ले यांनी खेळाडूंना विविध तांत्रिक बाबींवर मार्गदर्शन केले होते. ज्याचा फायदा संघाला संपूर्ण स्पर्धेत तसेच अंतिम सामन्यात मिळाला. तत्पूर्वी जिल्हास्तरीय शालेय हँडबॉल स्पर्धेत १४ वर्षा खालील मुलांच्या स्पर्धेत सलग १२ वर्षे विजयी राहून एक वेगळा विक्रम शाळेने प्रस्थापित केला.

जळगाव येथे ४ ते ७ नोव्हेंबर या कालावधीत राज्यस्तरिय हँडबॉल स्पर्धा होणार आहे. संघाचे मुख्य प्रशिक्षक प्रशांत महल्ले, सहाय्यक संगम डंगर, गिरीश मोहिते, अरुण घेमुड, सुशांत जुवळे, निशा घारे यांच्या मार्गदर्शनाखाली संघ सराव करत आहे. विभागीय हँडबॉल स्पर्धेतील कामगिरीमुळे न्यू होरायझन पब्लिक स्कूलचे संचालक स्वाती शिराळकर, प्राचार्या अमिता दत्ता, उपप्राचार्या पुष्पा मेनन, विद्यार्थी आणि शिक्षकवर्ग या सर्वांनी खेळाडू व त्यांचे प्रशिक्षक यांचे अभिनंदन व कौतुक करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# पाकिस्तान उपांत्यपूर्व फेरीत

## ■ हाँगकाँग क्रिकेट सिक्स टूर्नामेंट

**। हाँगकाँग । वृत्तसंस्था ।**

हाँगकाँग क्रिकेट सिक्स टूर्नामेंटमध्ये पाकिस्ताननं भारताचा ६ गडी राखून पराभव केला आहे. यासह पाकिस्ताननं गट टप्प्यातील दोन्ही सामने जिंकून उपांत्यपूर्व फेरीतील आपलं स्थान निश्चित केलं.

या सामन्यात टीम इंडियानं प्रथम फलंदाजी करताना निर्धारित ५ षटकात ११९ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात, पाकिस्ताननं हा सामना एकही विकेट न गमावता जिंकला. हाँगकाँग सिक्स टूर्नामेंटमध्ये एक संघ ६ खेळाडूंसह मैदानात उतरतो.

भारताकडून रॉबिन उथप्पा आणि भरत छिपली यांनी डावाची सुरुवात केली. उथप्पानं ८ चेंडूत ३१ धावा केल्या, तर भरतनं १६ चेंडूत ५३ धावांची शानदार खेळी केली. केदार जाधवला केवळ ८ धावा करता आल्या. त्याच्यानंतर मनोज तिवारीनं ७ चेंडूत १७ धावांची खेळी करत संघाची धावसंख्या ११९ पर्यंत नेण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. पाकिस्तानकडून फहीम अश्रफनं दोन्ही विकेट घेतल्या.




१२० धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना पाकिस्तानसाठी मुहम्मद अखलाक आणि आसिफ अली धमाकेदार सुरुवात केली. अखलाकनं १२ चेंडूत ४० धावा केल्या, तर आसिफ अलीनं १४ चेंडूत ५५ धावा ठोकल्या. मात्र तो सामना संपण्यापूर्वी रिटायर्ड झाला. उरलेलं काम कर्णधार फहीम अश्रफनं पूर्ण केलं. त्यानं अवघ्या ५ चेंडूत २२ धावा केल्या. येथे नमूद करण्यासारखी बाब म्हणजे, पाकिस्ताननं या स्पर्धेत आतापर्यंत एकही विकेट गमावलेली नाही. त्यांनी यापूर्वी यूएईला एकही विकेट न गमावता पराभूत केलं होतं.

हाँगकाँग सिक्स स्पर्धेत भारत आणि पाकिस्तानला यूएईसह क गटात स्थान देण्यात आलंय. पाकिस्ताननं प्रथम यूएईचा पराभव केला. यानंतर त्यांनी टीम इंडियाला हरवून थेट उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला आहे. भारतीय संघ सध्या एक सामना गमावून गुणतालिकेत दुसऱ्या स्थानावर आहे. टीम इंडियानं यूएईचा पराभव केल्यास ते उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश करू शकतात.






# राज्यस्तरीय कराटे स्पर्धेत अलिबागच्या मुलांची बाजी

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

बालेवाडीमध्ये नुकत्याच झालेल्या कराटे स्पर्धेत अलिबागच्या मुलांनी बाजी मारली. या स्पर्धेसाठी राज्यभरातून साडेसातशे विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

यात विराट पाटील (मुळे) याने कराटे फाईटमध्ये कांस्य पदक पटकावले, श्लोक पाटील (कार्ले) याने तीन राऊंड जिंकून कांस्य पदक पटकावले तर, श्रवण भोईर (सासवणे) याने उत्कृष्ट कराटे फाईट करून तिसरा क्रमांक पटकावला. तसेच, अंश नाईक (कुणे) आणि अर्णव खरात (पंथनगर) यांनीदेखील कराटे खेळाचे उत्कृष्ट प्रदर्शन केले. यांच्यासोबत कराटे ब्लॅक बेल्ट हरेश पाटील आणि वैभव पाटील यांनी कोच म्हणून काम पाहिले. राज्य संघटनेचे अध्यक्ष सल्लाउद्दीन अंसारी, सचिव संदीप गाडे, आंतरराष्ट्रीय पंच परमजीत सिंग यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले. यावेळी रायगड जिल्हा संघटनेचे सचिव संतोष कवळे यांनादेखील उत्कृष्ट पंच म्हणून गौरवण्यात आले.

## क्लासिफाईड

जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- प्रथम पुर्नविवाह, व्यंग, सर्वजातीय, आंतरजातीय वेबसाईटसह स्थळांसाठी रोहा गणेश महाकाळ ८८८८९३५७७५
- सन स्टोन रीयल इस्टेट साईना कॉम्प्लेक्स बायपास रोड चर्चच्या समोर N.A.प्लॉट अलिबाग परिसरात आहेत. लहान फार्म हाउस प्लॉट स्वतंत्र ७ X १२ ८६६९००६९०२, ९२७०८८८८०३
- सर्वसामान्यांना परवडणाऱ्या किंमतीतील घर पोयनाड अलिबाग येथे उपलब्ध Collector/Bank Approved Project 1RK & 1BHK. Starting price 12.25 Lac Onwards Diwali Offer. Booking 50,000/-Only Call + 7700999220/9022272212
- आयुर्विमा ऑफीस कामासाठी महिला पाहिजे पत्ता विजयनगर - वरसोली, वरसोली नाक्याजवळ मो.९४२२४९४५९०/७५०७९२९१२८
- विद्यानगर तांत्रिक विद्यालयामागे क्षितिज बंगला (तळमजला) भाड्याने देणे आहे. ९९६९८२८२३९ /९२७२३८३४७६

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# आयपीएलची रिटेंशन लिस्ट जाहीर

## धोनी अनकॅप्ड खेळाडू ; मुंबईत बुमराहसह ५ खेळाडू कायम

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

आयपीएल मेगा लिलाव-२०२४ साठी सर्व १० संघांनी खेळाडू कायम ठेवण्याची यादी (रिटेन लिस्ट) जाहीर केली आहे. ५ वेळा चॅम्पियन चेन्नई सुपर किंग्सने ५ खेळाडूंना कायम ठेवले आहे, त्यापैकी माजी कर्णधार एम एस धोनी अनकॅप्ड खेळाडू म्हणून खेळणार आहे.त्याचवेळी दिल्ली कॅपिटल्सने कर्णधार ऋषभ पंतला सोडले असून आता तो लिलावात उतरणार आहे. गुजरात टायटन्सने पाच खेळाडूंना कायम ठेवले असून यापैकी तीन कॅप आणि दोन अनकॅप्ड खेळाडू आहेत.

गुजरातने राशिद खान, शुभमन गिल आणि साई सुदर्शनला कॅप म्हणून कायम ठेवले. राहुल तेवतिया आणि शाहरुख खान हे दोन अनकॅप्ड खेळाडू आहेत. आता लिलावात गुजरातला राईट टू मॅच कार्डसह कॅप्ड खेळाडू जोडण्याची संधी मिळणार आहे. राजस्थान रॉयल्सन सहा खेळाडूंना कायम ठेवले आहे. यापैकी संजू सॅमसन, यशस्वी जैस्वाल, रियान पराग, ध्रुव जुरेल आणि शिमरोन हेटमायर या पाच खेळाडूंना कायम ठेवण्यात आले आहे. त्याचबरोबर संदीप शर्माला अनकॅप्ड खेळाडू म्हणून कायम ठेवण्यात आले आहे. आता संघाला लिलावात राईट टू मॅच कार्ड वापरण्याची संधी मिळणार नाही. ने आपले स्टार परफॉर्मर जोस बटलर, युझवेंद्र चहल आणि रविचंद्रन अश्विन यांना रिलीज केले आहे.

दिल्ली कॅपिटल्सने कर्णधार ऋषभ पंतला सोडले आहे. संघाने अक्षर पटेल, कुलदीप यादव, ट्रिस्टन स्टब्स आणि अभिषेक पोरेल यांना कायम ठेवले आहे. त्यात एक पोरेल अनकॅप्ड आहे. लिलावात दिल्लीला राईट टू मॅच कार्ड असेल. एलएसजीनेही पाच खेळाडूंना कायम ठेवले आहे. यामध्ये निकोलस पुरन, मयंक यादव, आयुष बडोनी, मोहसिन खान आणि रवी बिश्नोई यांचा समावेश आहे. पुरन, मयंक आणि बिश्नोई हे कॅप्ड खेळाडू आहेत, तर मोहसिन आणि बडोनी हे अनकॅप्ड खेळाडू आहेत. कोलकाता नाईट रायडर्सने कर्णधार श्रेयस अय्यरला रिलीज केले आहे. केकेआरने आंद्रे रसेल, सुनील नारायण, रिंकू सिंग आणि वरुण चक्रवर्ती या चार कॅप्ड खेळाडूंना आणि रमणदीप सिंग आणि हर्षित राणा यांच्या रूपात दोन अनकॅप्ड खेळाडूंना कायम ठेवले आहे.

**पंत २०१६ पासून दिल्लीसोबत होता आणि २०२२ मध्ये तो या फ्रँचायझीचा कर्णधारही झाला. लखनौ सुपर जायंट्सने केएल राहुलला सोडले आहे आणि कोलकाता नाइट रायडर्सने (केकेआर) कर्णधार श्रेयस अय्यरला सोडले आहे. यामध्ये हेनरिक क्लासेन हा सर्वात महागडा रिटेनर ठरला. सनरायझर्स हैदराबादने त्याला २३ कोटी रुपयांमध्ये आपल्या संघात कायम ठेवले. पंजाबने प्रभसिमरन सिंग आणि शशांक सिंगला कायम ठेवले आहे. हे दोन्ही खेळाडू अनकॅप्ड आहेत.**

सनरायझर्स हैदराबादने पाच खेळाडूंना कायम ठेवले आहे. सर्व कॅप्ड खेळाडू आहेत. यामध्ये कर्णधार पॅट कमिन्स, ट्रॅव्हिस हेड, हेनरिक क्लासेन, नितीश कुमार रेड्डी आणि अभिषेक शर्मा यांचा समावेश आहे. लिलावात त्यांना राईट टू मॅच कार्डसह अनकॅप्ड खेळाडू जोडण्याची संधी मिळेल. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने तीन खेळाडूंना कायम ठेवले आहे. विराट कोहली, रजत पाटीदार आणि यश दयाल यांना संघाने कायम ठेवले आहे. ग्लेन मॅक्सवेल, फाफ डू प्लेसिस आणि मोहम्मद सिराज या खेळाडूंना सोडण्यात आले आहे. ४ विजेतेपद पटकावणाऱ्या मुंबई इंडियन्सने फ्रँचायझी कर्णधार हार्दिक पंड्या, जसप्रीत बुमराह, सूर्यकुमार, रोहित शर्मा आणि तिलक वर्मा यांना कायम ठेवले आहे. ५ वेळा चॅम्पियन चेन्नई सुपर किंग्सने ५ खेळाडूंना कायम ठेवले आहे.

यामध्ये माजी कर्णधार एम एस धोनी (अनकॅप्ड), कर्णधार ऋतुराज गायकवाड, रवींद्र जडेजा, शिवम दुबे आणि श्रीलंकेचा वेगवान गोलंदाज मथिशा पाथिराना यांचा समावेश आहे.पंजाब किंग्सने (पीबीकेएस) केवळ दोन खेळाडूंना कायम ठेवले आहे.

# नेपाळविरुद्ध इंग्लंडचा अवघ्या ४ षटकांत पराभव

**हाँगकाँग :** हाँगकाँग सुपर सिक्स स्पर्धेत नेपाळनं इंग्लंडचा पराभव केला आहे. प्रथम फलंदाजी करण्यासाठी आलेल्या इंग्लंडनं ५.५ षटकांत ६ गडी गमावून ९७ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात, नेपाळनं ४.२ षटकांत एकही विकेट गमावता हे लक्ष्य गाठलं.

नेपाळकडून संदीप जोरानं सर्वाधिक धावा केल्या. तो १२ चेंडूत ५० धावा करून रिटायर्ड झाला. त्यानं आपल्या खेळीत ३ चौकार आणि ६ षटकार मारले. याशिवाय राशिद खान ५ चेंडूत २१ धावा करून नाबाद राहिला. राशिद खाननं आपल्या खेळीत २ चौकार आणि २ षटकार मारले. लोकेश बमनं ११ चेंडूत २० धावा केल्या.प्रथम फलंदाजी करताना इंग्लंडनं ५.५ षटकांत ६ बाद ९७ धावा केल्या होत्या.






# कलासक्त

**'जिंदगी एक सफर है सुहाना**
**यहा कल क्या हो किसने जाना' या किशोर कुमार यांच्या गाजलेल्या गाण्याप्रमाणेच त्यांचा मृत्यूही अचानक झाला होता. १९८७ च्या दिपावलीच्या दिपोत्सवाच्या दरम्यान किशोर कुमार हे जग अचानक सोडून गेले होते. त्यांच्या जाण्यामुळे आपण अनेक चांगल्या गाण्यांच्या आस्वादाला मुकलो. किशोरदा आणखी काही वर्षे जगले असते तर या सिने इंडस्ट्रीत किती गाणी त्यांनी गायली असती? कल्पना करताना हृदय विदीर्ण होते.**

## अमोघ स्वरानी रचलेली दीपमाळ म्हणजेच किशोरचे गाणे

श्रीराम शेटये



१३ ऑक्टोबर १९८७ ची एक सकाळ हृदयविकाराने झालेल्या मृत्युची बातमी येऊन धडकली. सर्व वृत्तपत्रांची हेडलाईन एकच होती. अवघी सीनेसृष्टी हळहळली होती. गायनक्षेत्राच्या प्रसिद्धिच्या शिखरावर असलेला किशोर कुमार नावाचा तारा गळून पडला होता. गाणे, अभिनय, निर्देशक अशा सर्वच भुमिका तेवढ्याच ताकदीने पार पाडणारा अवलिया म्हणजे किशोर कुमार. या बातमीने अनेकांना धक्का बसला. कालपर्यंत आपल्या अमोघ आवाजाने सिनेरसिकांना मंत्रमुग्ध करणारा हा अवलिया आज अचानक १३ ऑक्टोबर १९८७ रोजी सर्वांना दुःखात बुडवून गेला होता.

सकाळी किशोर यांनी त्याच्या पत्नी लीना चंदावरकर यांच्यासोबत गम्मत केली. अचानक बेडवर झोपून राहून आपण मेल्याचे सोंग घेतले. अर्थात किशोरकुमार आयुष्यभर गंमती जंमती करत राहिले. त्यांचा मृत्यू सुद्धा असाच अविश्वसनीय होता. लीना चंदावरकर यांनाही धक्का बसला होता कारण किशोर कुमार यांनी श्वास रोखून धरला होता. लीना चंदावरकर डॉक्टरला फोन करायला गेल्या तेव्हा किशोर कुमार यांनी मरणाचे सोंग घेतले होते ते त्यातून बाहेर आले. ते आपली पत्नी लीना चंदावरकर यांना म्हणाले, ''तू डॉक्टरला बोलावू नकोस नाहीतर मी खरोखर मरेन'' खरोखरच त्याच दिवशी त्यांनी मरणाचे सोंग घेतले होते पण खरोखरच त्यांचा मृत्यू झाला. ही अत्यंत दुर्दैवी घटना होती.

आजही किशोर कुमार आपल्या गाण्यांच्या स्वरूपात अजरामर आहेत. त्यांना जाऊन सदतीस वर्षे झाली परंतू आजही त्यांच्या गाण्यांची क्रेझ तरूणांपासून सर्व वयोगटांतील लोकांमध्ये आहे. आजही तितक्याच आवडीने त्यांची गाणी ऐकली जातात.

४ ऑगस्ट १९२९ रोजी मध्यप्रदेश मधील खांडवा येथे किशोर कुमार यांचा जन्म झाला.

त्यांचं खरं नाव आभासकुमार गांगुली. प्रसिद्ध गायक के. एल.सहेगल यांच्यासारखं गाण गायचं हे किशोर कुमार यांचे स्वप्न होते. लहानपणी किशोर कुमार यांचा आवाज बेसूरा होता. लहाणपणी एक अपघात घडला त्यात भाजी कापायच्या विळ्यावर त्यांचा पाय कापला. डॉक्टर कडे गेल्यावर उपचार चालु असताना दोन तीन दिवस ते रडत राहिले. पण त्यामुळे एक चमत्कार घडला त्यांचा कर्कश बेसुरा आवाज आता साफ झाला होता. त्यावेळी कोणाला ठाऊक की ह्या आवाजाचे लाखो लोक दिवाने होणार आहेत? किशोर कुमार यांनी गाण्याचे कोणतेही व्यावसाईक शिक्षण घेतले नव्हते.

लहाणपणी ते आपल्या मित्रपरिवार मध्ये खोडकरपणे गात असत. तेव्हापासुनच गायची सवय होती. खांडव्यामध्ये एक गुराखी म्हणून गुरांच्या मागे गाणे गात फिरणारा हा मुलगा आपल्या हरहुन्नरी स्वभावामुळे गायक बनला.

मोठे बंधु अशोक कुमार हे नामांकित अभिनेते होते. एकदा प्रसिद्ध संगीतकार एस.डी. बर्मन अशोक कुमार यांना भेटायला घरी आले होते. बाथरूम मधून गाण्याचा आवाज येत होता. एस डी म्हणाले ''कोण गात आहे?,'' अशोक कुमार म्हणाले माझा छोटा भाऊ गात आहे आंघोळ होईपर्यंत गाणे चालूच राहिल. ''एस. डी. बर्मन ना तो आवाज आवडला. एस. डी. बर्मन यांना किशोर कुमार यांनी एस. डी. बर्मन यांच्याच आवाजात गाऊन चकित केले होते.

किशोर कुमार गाताना ते गाणे कोणावर चित्रित होणार आहे याचा विचार करून त्या अभिनेत्याच्या शैलीला सूट होईल असाच आवाज काढीत असत.

अमिताभ बच्चन साठी त्यांचं गाण एवढ जुळून येई की जणू अमिताभ स्वतःच गात आहे असा भास होई. राजेश खन्ना नवोदित असताना तर राजेश खन्ना यांना आवाज देण्यापुर्वी प्रथम त्यांची मुलाखत किशोरदानी घेतली. राजेश खन्ना यांना त्यांनी अनेक प्रश्न विचारून भंडाऊन सोडले. तु का अभिनय करीत आहेस? असे विचारले तेव्हा राजेश खन्ना म्हणाले . ''मला लोकांची सेवा करायची आहे.'' किशोर कुमार म्हणाले, यात कसली सेवा आहे? राजेश खन्ना म्हणाले, ''लोकांचे मनोरंजन करून त्यांना आनंद देणे.''

हे उत्तर किशोरकुमार यांना आवडले त्यांनी राजेश खन्ना साठी चहा मागवला. आराधना चित्रपटासाठी राजेश खन्ना यांना शोभणारे ''मेरे सपनोकी रानी कभी आयेगी तू'' हे अजरामर गीत गायले.

किशोर कुमार यांनी सुमारे १५०० हिंदी गाणी गायली. झूमरू, पडोसन, चलती का नाम गाडी यांसारखा अनेक अजरामर चित्रपटांमधून काम केले. त्यांना आठ वेळा फिल्मफेअरने सन्मानित करण्यात आले. पाच फुट पाच इंच उंचीच्या सुमारे दिसणाऱ्या माणासाने आपल्या अभिनय आणि गायनाच्या सामर्थ्याने आकाशाला गवसणी घातली होती. म्हणूनच तर मधुबाला सारखी रूपगर्विता, लीना चंदावरकर आणि योगिता सारख्या सौंदर्यवती त्याच्यावर फिदा होत्या.

मोठे बंधु अशोक कुमार हे हिंदी चित्रपट सृष्टीतील सहगल यांच्या नंतरच्या काळात आलेले सुपरस्टार होते. 'दिलीप कुमार' व देवआनंद यांच्यासारखे कलाकार ज्यांचा आदर्श घेऊनच चित्रपट सृष्टीत आले ते जेष्ठ अभिनेते म्हणजे अशोक कुमार.

अशोक कुमार, किशोर कुमार आणि अनुप कुमार या तीन्ही बंधूच्या 'चलती का नाम गाडी' या चित्रपटात मधुबाला होती. या चित्रपटाच्या शूटिंग दरम्यान किशोरकुमार आणि मधुबाला यांच्यात जवळीक सूरू झाली होती.

दिलीप कुमार आणि मधुबाला यांच्यात दुरावा निर्माण झाला होता. कारण दिलीप कुमार यांना मधुबालाच्या वडिलांनी मधुबाला सोबत लग्न करायचे असेल तर एक अट घातली होती. ती अट अशी होती की दिलीप कुमार यांना मधुबालाच्या वडीलांव्यतिरीक्त इतर कोणाचे चित्रपट करता येणार नाही. दिलीप कुमार यांनी ही अट मान्य केली नाही. दिलीप कुमार यांच्या सोबत झालेल्या प्रेमभंगाच्या दुःखातून बाहेर येण्यासाठी मधुबाला हिला किशोर कुमार यांच्या नात्याचा उपयोग झाला. या सर्व प्रकरणात किशोर कुमार मधुबालाच्या प्रेमात पडले अगदी मधुबालाच्या मृत्यूपर्यंत किशोर कुमार तिच्यासोबत होते तिला झालेल्या कॅन्सरसारख्या दुर्धर आजारातही त्यांनी तिला उपचारासाठी अमेरीकेत नेले. परंतू दुर्दैवाने आजार काही कमी व्हायचे नाव घेईना. अतिव दुःखाने हतबल झालेले किशोर कुमार यांना तिचे हालहाल होताना पहावत नव्हते म्हणून मग शेवटच्या दिवसात किशोर कुमार सहा सहा महिने मधुबाला यांना भेटायला जातच नसत. तिच्या मृत्यूनंतर किशोर कुमार खुप रडले होते.

पडोसन चित्रपटातील रामलीला मध्ये काम करणाऱ्या कलाकारांची त्यांची व्यक्तीरेखा रसिकांना खुपच भावली होती. श्रीकृष्ण बनलेले किशोर कुमार आपल्या विनोदी अभिनयाने अक्षरक्षः प्रेक्षकांच्या डोळ्यांचे पारणे फेडत होते. मेहमुद ,सुनिल दत्त आणि सायरा बानू यांच्या अभिनयाने साकार झालेल्या या चित्रपटात किशोर कुमार यांची भुमिन्द्र संस्मरणीय झाली होती.

आपल्या एकंदरीत कारकिर्दीत राजेश खन्ना, अमिताभ बच्चन, जितेंद्र यासारख्या अनेक सुपरस्टार अभिनेत्यांसाठी गाणाऱ्या किशोर कुमार यांनी अनेक चित्रपटगीते आपल्या अमोघ आवाजाने अजरामर केली आहेत. युगलगीते, विरहगीते अशी सर्वच प्रकारच्या गीते ताकदीने गाणारे किशोर कुमार आपल्या तत्कालीन गायकांमध्ये अग्रेसर होते. गाण्यातील भाव आपल्या तरल आवाजाने रसिकांच्या हृदयापर्यंत सहज पोहचवण्याचा किशोर कुमार यांचा हातखंडा होता. कोणतेही शास्त्रीय गायणाचे शिक्षण न घेता हिंदी चित्रपट संगीत विश्वात किशोर कुमार यांनी अभुतपूर्व गरूड भरारी घेतली होते. किशोर कुमार एक ताकदीचे विनोदी अभिनेतेही होते. अनेक हिंदी चित्रपटात त्यांचा अभिनय वाखाणण्याजोगा होता. परंतू शेवटच्या काळात त्यांच्यातील अभिनेत्याला त्यांच्या उदंड गायणामुळे अभिनय करायला वेळच मिळाला नाही. त्यांनी आपल्या गायनाने किशोरकुमार नावाच्या एका नव्या युगाची सुरूवात केली आणि बाकीच्या गायंकांना मागे टाकले. किशोर कुमार नावाच्या झंझावाताने अवघी सिनेसृष्टी आनंदाच्या वादळात झपाटून गेली.

किशोर कुमार यांची गाणी म्हणजे सप्त सुरांची नितांत सुदर उधळण! अनेक बहारदार आनंदाने भरलेली गाणी. प्रेमाला नुकतेच फुटलेले हळूवार धूमारे. प्रणयाच्या चिरतरुण रात्रीचे स्वर. विरहाची व्याकुळता दाखविणारे रूदन अशा अनेक तेजोमय स्वरांची दिपमाळ म्हणजेच किशोर कुमार यांचे गाणे.

## 'मिशन अयोध्या' चित्रपटाची प्रदर्शन तारीख जाहीर!

राम कोंडीलकर




दिवाळीच्या मंगलमय वातावरणात, मराठी चित्रपटसृष्टीतील एका अत्यंत महत्त्वाकांक्षी चित्रपटाने विलक्षण कुतूहल निर्माण केले आहे. समीर रमेश सुर्वे लिखित - दिग्दर्शित आणि निर्माते कृष्णा दादाराव शिंदे, सौ. योगिता कृष्णा शिंदे यांच्या 'आर के योगिनी फिल्म्स प्रॉडक्शन प्रा. लि.' निर्मित 'मिशन अयोध्या' या चित्रपटाच्या महाराष्ट्रातील प्रदर्शनाची तारीख दिवाळीच्या मंगलमय मुहूर्तावर नुकतीच जाहीर करण्यात आली. येत्या वर्षात २३ जानेवारी २०२४ रोजी हा चित्रपट संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटाचे शीर्षक जाहीर होताच त्याने सर्वांचे लक्ष वेधले असून त्याच्या प्रदर्शनाची उत्सुकता आता शिगेला पोहोचली आहे.

'मिशन अयोध्या' या चित्रपटाच्या शीर्षकाने सर्वांच्या मनात कुतूहल चालविले असून अयोध्येतील प्रभू श्रीराम जन्मभूमी मंदिराची रेखीव प्रतिमा या शीर्षक पोस्टरवर असून अयोध्या श्रीराम मंदिर निर्मितीच्या प्रथम वर्षपूर्तीचे निमित्त साधून हा चित्रपट येत्या वर्षात २३ जानेवारी २०२४ रोजी संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होणार असल्याचे निर्मात्यांनी जाहीर केले आहे. लेखक दिग्दर्शक समीर रमेश सुर्वे यांनी हा चित्रपट दिग्दर्शित केला आहे.

समीर रमेश सुर्वे यांनी यापूर्वी व.पु. काळे यांच्या लोकप्रिय कादंबरीवरील 'श्री पार्टनर', 'शुभलग्न सावधान', 'जजमेंट' या गाजलेल्या चित्रपटांचे लेखन दिग्दर्शन आणि 'शुगर सॉल्ट आणि प्रेम'चे संवाद लेखन तसेच भोजपुरीतील 'नचनिया' या चित्रपटाचे लेखन दिग्दर्शन केले आहे. अत्यंत कल्पक आणि शिस्तबद्ध दिग्दर्शक म्हणून समीर हे चित्रपटसृष्टीत सुपरिचित आहेत.

'मिशन अयोध्या' चित्रपटाची कथा रामभक्ती आणि अयोध्या या ऐतिहासिक संदर्भात गुंफलेली असल्याने चित्रपटाबद्दल जनमानसात प्रचंड उत्सुकता निर्माण झाली आहे. विशेष म्हणजे या चित्रपटातील कलाकार आणि निर्मितीशी संबंधित इतर सदस्यांची नावे अद्याप गुपित ठेवली गेली आहेत. त्यामुळे या चित्रपटातील भूमिकांमध्ये कोणते कलाकार दिसणार, याबाबत सर्वांनाच कुतूहल आहे.

दिग्दर्शक समीर रमेश सुर्वे यांनी या चित्रपटाबद्दल अधिक माहिती देताना सांगितले, ''मिशन अयोध्या' हा चित्रपट केवळ मनोरंजनाच्या पलिकडे जाऊन महाराष्ट्रातील जनतेच्या मनातील रामप्रेमाच्या आदर्शांना न्याय देण्याचा प्रयत्न करतो., एक विशेष औचित्य साधून प्रदर्शित होत असल्याने प्रेक्षकांसाठी तो एक अविस्मरणीय अनुभव ठरणार आहे.''

## कृतज्ञाच्या मायेची चादर हरपली





कृतज्ञा हले

कुटूंबातील एक आधार, मैत्रीच्या दुनियेतील राजा माणूस, दानशूर, गावाबद्दल व गावकऱ्यांबद्दल अफाट प्रेम असलेले समाजसेवक जनार्दन हले यांचे नुकतेच अल्पशा आजारामुळे निधन झाले. बाप म्हणजे जगण्याचं माप, पाठीवरील कौतूकाची थाप, ध्येयाकडे नेणारी शिडी, संकटातून पार करणारी होडी असे जाणकार व्यक्तीने म्हटले आहे. हाच बाप ज्यावेळेला कायमचा सोडून जातो. त्यावेळेला कुटूंबाचे छत्र, मुलीच्या मायेची चादर हरपल्यासारखे वाटते. वडिलांच्या निधनानंतर शोक व्यक्त करताना थेरोंडा येथील कृतज्ञा हले यांनी त्यांच्या वडिलांच्या कार्याचा आढावा घेतला.

अलिबाग तालुक्यातील रेवदंडा परिसरातील थेरोंडा येथील डोऱ्याचीवाडी येथील जनार्दन पोशा हले यांचे लहानपण अत्यंत गरीबीत गेले. घरात भावंडामध्ये ते मोठे असल्याने संपुर्ण कुटूंबाची जबाबदारी अगदी कमी वयात त्यांच्यावर पडली. कुटूंब सांभाळत असताना त्यांनी शिक्षण पुर्ण केले. त्यानंतर त्यांना महसूल खात्यामध्ये तलाठी या पदाची नोकरी मिळाली. पालघर जिल्ह्यातील जव्हार याठिकाणी त्यांची नियुक्ती झाली. अलिबागपासून शेकडो दुर असलेल्या गावापासून घरापासून दूर जाण्याची त्यांच्यावर वेळ आली. तलाठी म्हणून सेवा करीत असताना त्यांनी समाजसेवेची भावना कायम ठेवली. त्यांच्या दिलदार स्वभावाने तेथील सर्व घटकांमध्ये ते मिसळून गेले. कुटूंबातील व्यक्तीप्रमाणे त्यांना सन्मान मिळू लागला.

मेहनत व कष्टाच्या जोरावर त्यांना नोकरीत चांगले यश मिळाले. महसूल खात्यात काम करीत असले, तरी ते चांगले क्रिकेट खेळाडू होते. गावापासून महसूल विभागाच्या क्रीडा स्पर्धेत त्यांचा सक्रीय सहभाग होता. अनेकवेळा ते कोकण विभागाचे क्रिकेटचे कप्तान म्हणून राहिले आहेत. वयाच्या ५० व्या वर्षी त्यांनी ५० धावा करून एक वेगळा विक्रमही करून दाखविला. अलिबागमधील क्रिकेटचे दैवत म्हणून त्यांना ओळखले जात होते. महसूल विभागात तलाठी म्हणून कार्यरत असल्याने जानू त्यात्या म्हणून ते या नावाने संबोधले जात होते. गरीबी त्यांनी जवळून पाहिल्याने गरजूंना मदतीचा हात त्यांनी कायमच दिला.

नोकरी, समाजकारण करीत असताना त्यांनी कुटूंबावरही चांगल्या प्रकारे लक्ष दिले आहेत. मुलांना उच्च शिक्षित बनविण्याचा त्यांनी ध्यास घेतला. मुलांना उंच भरारी घेता यावी. त्यांची स्वतःची एक वेगळी ओळख निर्माण व्हावी यावर त्यांनी भर दिला.

त्यांची मोठी मुलगी कृतज्ञा हिने उच्च शिक्षण घेऊन ती आज वैमानिक आहे. भारतातील एका मोठ्या विमान कंपनीत कॅप्टन म्हणून ती कार्यरत आहे. त्यांचा मुलगा निनाद जनार्दन हले यांनी इंग्लंडमधून आर्किटेक्टचे शिक्षण घेतले. मात्र त्यांनी पारंपरिक मासेमारीचा व्यवसाय स्वीकारला. आज या व्यवसायात निनाद एक यशस्वी उद्योजक म्हणून कार्यरत आहेत. जनार्दन हले यांचे सर्व कुटुंब सुखासमाधानात नांदत असताना त्यांच्या कुटूंबियावर दुःखाचे डोंगर कोसळले. वयाच्या ५८ व्यावर्षी अल्पशा आजारामुळे जनार्दन हले यांचे निधन झाले. तालुक्यातील, जिल्ह्यातील बरीचशी मान्यवर मंडळी, नातेवाईक, मित्रमंडळी व हितचिंतकांनी त्यांना श्रद्धांजली अर्पण केली. वडिलांच्या निधनाने एक मोठी पोकळी निर्माण झाली आहे. रेवदंडा गावातील कृतज्ञा हले या मुलीने पायलट होण्याचे स्वप्न लहानपणीच पाहिले होते. तिचे वडील जनार्दन हले यांनी या स्वप्नांना प्रत्यक्षात उतरविण्यासाठी तिला बळ दिले. ध्येयाकडे झेपावण्यासाठी फडफडणाऱ्या पंखांना प्रोत्साहन देण्याचे काम कृतज्ञाचे वडिल जनार्दन हले यांनी खंबीरपणे उभे राहून दिले. मुलीच्या ध्येयभरारीवर विश्वास ठेवून पालकांनी तिला प्रत्यक्षक्षणी पाठिंबा दिला. तिच्या स्वप्नाचा आणि ध्येयाचा त्यांनी कधीही कोंडमारा होऊन दिला नाही.

कोरोना महामारीमुळे कृतज्ञाची नोकरी गेली. आठ महिने घरातच राहावे लागले. आई-वडिलांच्या अपेक्षा धुसर होत होत्या. लोक वेडे समजून हसत होते. मुलगी परक्याचे धन असे सांगत होते. मुलीच्या शिक्षणासाठी केलेला खर्च वाया गेला असेही म्हणणारे होते परंतु आईवडिलांच्या विश्वासाने उमेद खचू दिली नाही. सर्वजण एकमेकांच्या पाठीशी ठाम उभे राहिले. निराश न होता मोठ्या जिद्दीने कृतज्ञाच्या प्रयत्नांना बळ दिले.

**(शब्दांकन : प्रमोद जाधव)**

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
**■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)